
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा



वर्ष सतरावे / अंक १० / ऑक्टोबर २०१६

## संपादकीय

## मेंडेलिव्हचे मूलद्रव्य कोष्टक आणि पाणिनी

विज्ञानाच्या कक्षा दर क्षणाला रुंदावत असतात. जुन्या प्रश्नांना जेवढी उत्तरं मिळत असतात, त्याच वेगाने नवीन प्रश्नही निर्माण होत असतात. म्हणूनच विज्ञान हे कुठल्याही क्षेत्रामध्ये अंतिम उत्तर देत नाही. प्रत्येक उत्तर हे नवीन प्रश्न निर्माण करते, आणि ही प्रश्नोत्तरांची प्रक्रिया चालू राहाते.

सगळे जग हे मूलद्रव्यांनी बनले आहे, हे आपण सर्वजण जाणतो. अगदी सोप्या भाषेत सांगायचे म्हणजे मूलद्रव्यांचे कितीही पृथ्थक्करण केले तरी शेवटी शिल्लक राहते ते मूलद्रव्यच असते. ही मूलतत्त्वे घन, वायू, द्रव्य स्वरुपात असू शकतात. यांच्या मिश्रणातून अनेक वस्तू निर्माण होतात. या सगळ्या परिस्थितीचा व्यापकतेने अभ्यास करण्याचा प्रयत्न मनुष्य गेली अनेक शतकं करीत आहे, आणि आजही तो प्रयत्न चालूच आहे.

२५ जुलै २०१६ ला International Union of Pure and Applied Physics (IUPAP) National Committee ची एक महत्त्वाची सभा नवी दिल्लीला पार पडली. Periodic Table (मेंडेलिव्हची आवर्त सारणी) मध्ये ११३, ११५, ११७ आणि ११८ या क्रमांकाच्या नवीन मूलद्रव्यांचा (elements) शोध लागल्याची घोषणा या सभेत त्यांनी केली. IUPAP प्रमाणेच International Union of Pure and Applied Chemistry (IUPAC) या संस्थेच्या वैज्ञानिकांनी जगातल्या अनेक प्रयोगशाळांमध्ये संशोधन करून या मूलद्रव्याची निश्चिती केली.

मूलद्रव्य ११३ ला 'Nh' हे चिन्ह निश्चित झाले आणि त्याला नाव दिलं गेलं 'Nihonium', जपानमधील Nishina Center for Accelerator Science या प्रयोगशाळेमध्ये या मूलद्रव्याचा शोध लागला. जपान हा उगवत्या सूर्याचा देश आहे आणि त्या देशाचे जॅपनीज नाव 'Nihon' असे असल्यामुळे या मूलद्रव्याला 'निहोनियम' (Nihonium) असे नाव दिले गेले.

मूलद्रव्य ११५ ला 'Mc' हे चिन्ह मिळाले आणि त्याचे नामकरण झाले Moscovium. रशियामधील Joint Institute for Nuclear Research (JINR) या प्रयोगशाळेनी अमेरिकेमधील काही प्रयोगशाळांच्या मदतीनी या मूलद्रव्याचा शोध लावला म्हणून त्याला नाव मिळाले 'मॉस्कोवियम'.

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

मूलद्रव्य ११७ ला चिन्ह मिळालं 'Ts' आणि त्याचं नामकरण झाले 'Tennessine'. अमेरिकेतील 'Tennessee' या राज्यातील Oak Ridge National Laboratory मध्ये या मूलद्रव्यावर संशोधन झाले आणि म्हणूनच या मूलद्रव्याला 'टेनेसिन' असे नाव देण्यात आले.

मूलद्रव्य ११८ ला 'Og' असे चिन्ह मिळाले, आणि त्याला नाव दिले गेले 'Oganesson'. या मूलद्रव्याला नाव मात्र प्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ 'Yuri Oganessian' यांच्या नावावरून देण्यात आले आहे.

या शोध लागलेल्या चार नवीन मूलद्रव्यांमुळे आवर्त सारणीतील (Periodic Table) सातवी रांग पुरी झाली. अर्थातच यामुळे आठव्या रांगेकरता मूलद्रव्यांचा शोध चालूच आहे. या नवीन मूलद्रव्यांच्या भौतिक, आणि रासायनिक गुणधर्मांचा अभ्यास होणे अजून बाकीच आहे.

भौतिक आणि रसायनशास्त्रामध्ये मूलद्रव्यांच्या गुणधर्मांचा तौलनिक अभ्यास करून, ते कोष्टक स्वरूपात मांडणे हा एक महत्त्वाचा टप्पा होता. १९ व्या शतकात Johann Dobereiner, de Chancourtois आणि John Newlands यांनी मूलद्रव्यांच्या गुणधर्मावर आधारित माहिती जमा करून कोष्टकाच्या स्वरुपात मांडण्याचा प्रयत्न केला असला तरी याचे सगळे श्रेय हे डिमिट्री मेंडेलिव्ह (Dimitri Mendeteev, 1834 -1907) यांना देण्यात येते.

डिमिट्री मेंडेलिव्ह हे रसायन शास्त्रातील मोठे शास्त्रज्ञ होते आणि मूलद्रव्यांच्या कोष्टका पलीकडेही रसायनशास्त्रातील काही मूलभूत शोध त्यांनी लावले आहेत. ६ मार्च १८६९ ला "Russian Chemical Society समोर, The Dependence Between the Properties of the Atomic Weights of Elements." हा शोधनिबंध त्यांनी सादर केला.



**डिमिट्री मेंडेलिव्ह**

१८६९ मध्येच रशियामधील फारशा प्रसिद्ध नसलेल्या एका संशोधन पत्रिकेमध्ये ६३ मूलद्रव्यांचे कोष्टक त्यांनी प्रकाशित केले, आणि त्याचेच पुनर्मुद्रण लगेचच जर्मनीतील संशोधन पत्रिका Zeitschrift fur chemie मध्ये झाले. इंग्रजीमध्ये त्या शोधनिबंधाचे शीर्षक "On the Relationship of the Properties of the Elements to their Atomic Weights" असे आहे.

मेंडेलिव्ह यांचा जन्म सैबेरिया येथील एका खेड्यांत झाला. प्राथमिक शिक्षणानंतर त्यांची आई त्यांना मॉस्को येथील विद्यापिठात पुढील शिक्षणाकरता घेऊन गेली. मॉस्को विद्यापीठाने त्यांना प्रवेश नाकारला. तेथून त्यांची आई त्यांना सेंट पिटर्स बर्ग (Saint Petersburg) ला घेऊन गेली आणि तेथील विद्यापीठात त्यांना प्रवेश मिळाला. पुढील त्यांचे सर्व आयुष्य हे सेंट पिटर्सबर्ग मध्येच गेले. १८६५ मध्ये त्यांना "On the Combinations of Water with Alcohol" या प्रबंधाकरता 'विद्या वाचस्पती' (Doctoral) पदवी बहाल करण्यात आली. रसायनशास्त्रामधील त्यांच्या मूलभूत संशोधनामुळे सेंट पिटर्सबर्ग आणि त्यांना जागतिक मान्यता मिळाली. लंडनची रॉयल सोसायटी तसेच Royal Swedish Academy of Sciencesचेही मानद सभासदत्व त्यांना मिळाले होते. रशियामध्ये त्यांच्या नावानी अनेक संस्था तर आहेतच पण चंद्रावरील एका क्रेटरलाही (crater) त्यांचं नाव देण्यात आले आहे. मूलद्रव्यांच्या कोष्टकामधील १०१ व्या मूलद्रव्याला Mendelevium असे नाव देण्यात आले आहे.

(पृष्ठ क्र.४० वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

वर्ष सतरावे/अंक १०/ऑक्टोबर २०१६

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २१ वे/अंक ४ था)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | इंडियन इन्स्टिट्यूट, ऑक्सफर्ड | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | ओळख वनस्पतींची- बेल / बिल्वपत्र | श्री. प्रकाश दुधाळकर | ७ |
| ४) | अमेरिका, आंतरराष्ट्रीय राजकारण, दहशतवाद व सीआयए | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | ८ |
| ५) | मूल्यवेध-५: त्वरा | श्री. नरेंद्र गोळे | १८ |
| ६) | नर्मदा परिक्रमा (भाग : ३२) | श्री. अरविंद ओक | २१ |
| ७) | वस्तू व सेवा कर (GST) | श्री. प्रशांत शिंदे | २३ |
| ८) | ऑक्सफर्ड, केंब्रीज, लंडन शैक्षणिक सहल | श्री. सुभाष एंगडे | २५ |
| ९) | शेक्सपिअरच्या मातृभूमीतून | प्रा. प्रशांत धर्माधिकारी | २८ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | ३५ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश ‘विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा’ या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# इंडियन इन्स्टिटट्यूट, ऑक्सफर्ड

*ऑक्सफर्ड शहरात इंडियन इन्स्टिटट्यूट नावाची संस्था आहे. १०० वर्षांहून जुन्या असलेल्या या संस्थेने भारतीय संस्कृतीला मोलाचे योगदान दिले आहे. या संस्थेची माहिती या लेखात दिलेली आहे – संपादक*

विद्या प्रसारक मंडळ ठाणे यांच्या वतीने मागील अनेक वर्षांपासून इंग्लंडची शैक्षणिक सहल आयोजित करण्यात येते. या सहलीत ऑक्सफर्ड या शहराला भेट देण्याचा कार्यक्रम असतो. पहिल्या दिवशी आम्ही शहरातून फेरफटका मारतो. ऑक्सफर्ड हे शैक्षणिक संस्थांसाठी प्रसिद्ध असलेले शहर आहे. या एका शहरात ३८ महाविद्यालये आहेत. आपण ब्रॉड स्ट्रीटवर चालायला लागलो की दोन्ही बाजूला महाविद्यालयांच्या दगडी इमारती आपल्याला पाहायला मिळतात. चालत चालत आपण ब्रॉड स्ट्रीटच्या टोकाला पोहोचलो की एक वेगळीच इमारत आपल्या नजरेस पडते. लाल दगडांनी बांधलेली ही इमारत असून तिच्या वरच्या बाजूला एक वातकुक्कूट लावले आहे. त्याचे वैशिष्ट्य असे की तेथे कोंबड्या ऐवजी एका हत्तीची प्रतिकृती लावलेली आहे. इमारतीच्या दर्शनी भागावर नजर टाकली तर तेथे देखील हत्तीच्या प्रतिकृती आपल्याला दिसतात. त्यामुळे सहजच आपली नजर त्या इमारतीकडे जाते. त्या इमारतीच्या पुढच्या भागात 'मार्टिन स्कूल' अशी पाटी आहे. इमारतीच्या जरा जवळ जाऊन पाहिले तर आपल्याला



इंडियन इन्स्टिटट्यूटची इमारत

दगडावर कोरलेली अक्षरे दिसतात. ही अक्षरे जुळवून पाहिली की तिथे INDIAN INSTITUTE असे लिहिले असल्याचे आपल्या लक्षात येते. ऑक्सफर्ड शहरात भारतीय संस्थेची इमारत पाहिल्यावर आश्चर्य वाटल्यावाचून राहात नाही. नेमके तेच आमच्या गटातील लोकांचे झाले.

आत जाऊन ही भारतीय संस्था पाहण्याची सर्वांनीच इच्छा व्यक्त केली. आत प्रवेश करण्यापूर्वी परवानगी घ्यावी म्हणून मी आत गेलो आणि तेथे असलेल्या व्यक्तीशी संपर्क साधला. त्याला सांगितले की, 'आम्ही मुंबईहून आलो आहोत आणि या शहरातील शिक्षण संस्था पाहात आहोत. या शहरात इंडियन इन्स्टिटट्यूट या नावाची संस्था पाहून आम्हाला जरा कुतूहल वाटले. म्हणून ती आम्ही आतून पाहू इच्छितो. त्यासाठी परवानगी काढावी लागेल की काय हे विचारण्यासाठी मी आत आलो आहे, त्यावर ते गृहस्थ म्हणाले,''तुम्हाला कुतूहल वाटणे रास्त आहे. ही भारतीय संस्थेचीच इमारत आहे. परंतु आता येथे ती संस्था नाही. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ही संस्था बरखास्त करण्यात आली. त्यानी सांगितले की, आधी येथे वाचनालय आणि वस्तू-संग्रहालय होते. आता मात्र 'मार्टिन स्कूल' नावाची शिक्षण संस्था आहे. आतल्या बाजूला वर्ग खोल्या खेरीज दुसरे काही नाही. तेथे पाहण्यासारखे काहीही नाही. तुम्हाला हवे असेल तर तुम्ही प्रवेश द्वारा जवळ असलेला संस्कृत भाषेतील फलक पाहू शकता. त्याची परवानगी घेऊन आम्ही आत गेलो. प्रवेश करताच डाव्या बाजूला संस्कृत भाषेत लिहिलेला

तुमचा काळ चांगला असतो तेव्हा तुमच्या चुकाही हसत हसत स्विकारल्या जातात. परंतु जेव्हा वाईट काळ येतो तेव्हा तुमचा विनोदही गांभीर्याने घेतला जातो.

फलक आहे. या फलकाच्या खालीच त्याचे इंग्रजीत भाषांतर दिलेले आहे. त्यानुसार संस्कृत फलकावर लिहिलेल्या मजकुराचा अर्थ असा होतो की, ही संस्था पौरात्य विज्ञानाला वाहिलेली आहे. याचा उपयोग आर्य लोकांनी म्हणजे भारतीय आणि इंग्रज लोक या दोघांनीही करून घ्यावयाचा आहे. भारतातील ज्ञान परंपरेला इंग्रज लोक किती महत्त्व देत असत याची खात्री या फलकावरून होते. फलक पाहून झाल्यावर आम्ही इमारतीच्या बाहेर पडलो. आमच्या गटातील सगळेच जण प्रश्नार्थक चेहऱ्याने माझ्याकडे पाहू लागले. या शहरात भारतीय संस्था कशी काय? असा प्रश्नच त्यांनी उपस्थित केला. पुढे जाण्यापूर्वी या प्रश्नाचे उत्तर देणे आवश्यक होते.



**संस्थेच्या प्रवेशद्वाराजवळ असलेला फलक**


साधारणपणे सतराव्या शतकात व्यापाराच्या निमित्ताने इंग्रज लोक भारतात आले. त्यांचा व्यापार व्यवसाय चांगला भरभराटीला आला. त्यानंतर त्यांनी भारतीय राजकारणात लक्ष घालायला सुरुवात केली. आपल्या मुत्सद्देगिरीचा आणि भारतीय लोकांमधील फुटीरतेचा उपयोग करून देशाचा बराचसा भाग त्यांनी ताब्यात घेतला. त्यानंतर व्यापाऱ्यांखेरीज इतर लोकांचे येण-जाणे सुरू झाले. यामध्ये जसे धर्मप्रसारक होते तसेच अभ्यासक देखील होते. त्यांच्या असे लक्षात आले की, भारत हा एक सुसंस्कृत देश असून येथे जुनी साहित्य परंपरा आहे. याखेरीज इथली लेणी, देवळे, नैसर्गिक साधनसंपत्ती अभ्यासकाला आकर्षित करतील अशीच आहे. त्याचबरोबर, इथल्या सामाजिक रूढी, सणवार एव्हढे प्रगल्भ आहेत की, त्यांचा अभ्यास हा ज्ञानवर्धक असाच आहे. इंग्रजी लोकांचे एक वैशिष्ट्य असे की, त्यांच्यात ज्ञानलालसा ठासून भरलेली आहे. जिथून ज्ञान मिळेल तिथून घेऊन त्याचा संग्रह करण्याची त्यांची सवय आहे. भारतीय उपखंडाने त्यांच्या ज्ञानलालसेला चांगलेच खाद्य पुरविले. त्यातून भारतीय उपखंडाचा पद्धतशीर अभ्यास करण्याची कल्पना उदयास आली. त्यादृष्टीने काही विचारवंतांनी कामाला सुरुवात केली. भारताचा पद्धतशीर अभ्यास करता यावा यासाठी एका संस्थेची निकड त्यांना जाणवली. ती पूर्ण करण्यासाठी ऑक्सफर्ड शहरात भारतीय संस्थेची स्थापना करण्यात आली. या कामात मोनिएर विलियम्स नावाच्या अभ्यासकाने महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्याबद्दल जाणून घेणे उपयुक्त ठरेल.



**मोनिएर विलियम्स**

मोनिएर विलियम्स हा पौरात्य संस्कृतीचा अभ्यासक होता. भारतातील मुंबई शहरात १८१९ मध्ये त्याचा जन्म झाला. त्याचे वडील भारतीय भूगर्भ संस्थेत मोठ्या


पदावर काम करीत होते. त्याला चांगले शिक्षण मिळावे यासाठी त्याच्या वडिलांनी त्याला इंग्लंडला पाठविले. शालेय शिक्षण पूर्ण करून त्याने पदवीसाठी ऑक्सफर्ड शहरातील बॅलियल महाविद्यालयात प्रवेश केला. महाविद्यालयीन शिक्षण काळातच त्याच्या मनात भारतीय संस्कृतीबद्दल कुतूहल निर्माण झाले. त्यानंतर भारतीय संस्कृती जवळून समजून घेण्यासाठी तो भारतात आला. इथल्या पंडितांशी त्याने सविस्तर चर्चा केली. या चर्चेतून त्याच्या असे लक्षात आले की, संस्कृत ही एक प्रगल्भ अशी भाषा असून या भाषेत ज्ञानाचा खजिना आहे. या खजिन्याची माहिती करायची असेल तर ही भाषा अवगत करणे आवश्यक आहे हे त्यांनी ताडले. त्यानुसार त्याने संस्कृत भाषेचा अभ्यास केला. या भाषेत असलेली अफाट शब्दसंपत्ती पाहून तो चक्रावून गेला. इंग्रजी भाषिक लोकांना या शब्दांचे अर्थ लावता यावेत यासाठी त्याने 'संस्कृत इंग्रजी शब्दकोश' तयार केला. त्याच्या या कामाला तोड नाही. आजही हा शब्दकोश एक आदर्श शब्दकोश म्हणून मानला जातो.





**संस्कृत इंग्रजी डिक्शनरी**

मोनिएर विलियम्सने अनेक संस्कृत ग्रंथांचे इंग्रजीत भाषांतर केले. त्यात समावेश आहे कालिदासाच्या शांकुतलचा. हे भाषांतर युरोपमध्ये खूप गाजले. त्याचबरोबर, त्याने हिंदू धर्माची माहिती देणारी अनेक पुस्तके लिहिली. यामध्ये समावेश होतो तो Brahmanism and Hinduism, Indian Wisdom, Indian Epic Poetry, Fundamentals of Hinduism, इत्यादी. ही कामे करण्यामागे त्याचा उद्देश स्पष्ट होता. त्याला भारतात ख्रिश्चन धर्माचा प्रसार करावयाचा होता. हिंदूंच्या चालिरिती, सणवार, सामाजिक स्थिती या सर्वांची चांगली माहिती घेऊन जर आपण धर्म प्रचाराच्या कामाला लागलो तर अख्ख्या देशात ख्रिस्ती धर्म पसरेल असा त्याचा विश्वास होता. त्याच्या या विश्वासाचा त्याला फायदाही झाला. ऑक्सफर्ड विद्यापीठात जोसेफ बोडेन यांच्या नावाने एक प्राध्यापकाचे पद आहे. त्याला बोडेन चेअर असे म्हणतात. लेफ्टनंट कर्नल जोसेफ बोडेन हे इस्ट इंडिया कंपनीत सैनिक होते. त्याची अशी इच्छा होती की, भारतातील जास्तीत जास्त लोकांना ख्रिस्ती धर्मात आणावे. त्यासाठी संस्कृत साहित्याचा अभ्यास करण्याची गरज आहे असे त्यांचे ठाम मत होते. म्हणून संस्कृत वाङ्मयाचा पद्धतशीर अभ्यास करण्यासाठी त्याने ऑक्सफर्ड विद्यापीठात बोडेन प्रोफेसर ऑफ संस्कृत हे पद निर्माण केले. यासाठी त्याने आपली सगळी इस्टेट ऑक्सफर्ड विद्यापीठाला देऊन टाकली. विद्यापीठाने १८३२ साली हे पद निर्माण केले आणि ऑक्सफर्ड विद्यापीठातील स्नातकानी या पदासाठी योग्य व्यक्तीची निवड करावी असा नियम केला. या पदाचे प्रथम मानकरी होण्याचा बहुमान होरेस हेमन विल्सन या संस्कृत पंडिताला प्राप्त झाला. १८६० साली त्यांच्या निवृत्तीनंतर हे पद रिक्त झाले. तेंव्हा मोनिएर विलियम्सने त्या पदासाठी अर्ज केला. त्याच पदासाठी मॅक्समुलर यानी देखील अर्ज केला. मॅक्समुलरचे भारतीय संस्कृतीबद्दलचे काम वादातीत होते. पण हा अभ्यास केवळ ज्ञानवृद्धीसाठी केला जावा अशी त्यांची श्रद्धा होती. याउलट भारतीय

संस्कृतीचा अभ्यास हा भारतीयांना ख्रिश्चन करण्यासाठी केला जावा असे मोनिएर विलियम्सचे म्हणणे होते. शेवटी त्याच्याच पारड्यात वजन टाकून १८६० मध्ये बोडेन चेअर त्याना देण्यात आली. या पदावर ते १८९९ पर्यंत म्हणजे त्यांच्या मृत्यूपर्यंत होते.




**मोनिएर विलियम्सने लिहिलेली काही पुस्तके**

मोनिएर विलियम्स यांच्या कामामुळे संस्कृत भाषेत उपलब्ध असलेले ज्ञान भांडार आंग्ल भाषिकांना उपलब्ध झाले. या कार्याला इंग्लंडमध्ये चांगला प्रतिसाद मिळू लागला. त्यामुळे भारताचा अभ्यास करणारी एक स्वतंत्र संस्था इंग्लंडमध्ये असावी असे मोनिएर विलियम्सला वाटू लागले. आपल्या कल्पनेला मूर्त रूप देण्यासाठी तो १८७५ ते १८८३ या कालावधीत तीन वेळा भारतात आला. देशातील विचारवंतांना आणि राजेरजवाड्यांना भेटून आपली कल्पना त्यांना पटवून दिली. त्यातील अनेकांनी आर्थिक सहाय्य देण्याचे मान्य केले. अशी सगळी जुळवाजुळव झाल्यावर त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठापुढे भारतीय संस्थेची कल्पना १८८१ मध्ये मांडली. त्या योजनेला लवकरच मंजुरी मिळाली. १८८३ मध्ये प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या हस्ते या इमारतीचा शिलान्यास करण्यात आला. जेथे आता इंडियन इन्स्टिट्यूट आहे तेथे दोन-तीन लहान-सहान इमारती होत्या. त्या तोडून तेथे एक प्रशस्त इमारत बांधण्यात आली. १८८५ साली या संस्थेची रीतसर सुरुवात झाली. या इमारतींमध्ये काही वर्ग, एक संग्रहालय आणि एक वाचनालय होते. १९२७ मध्ये जेव्हा बोडलियन वाचनालयाचा विस्तार केला गेला तेव्हा येथल्या वाचनालयातील पुस्तके बोडलियन वाचनालयात स्थलांतरित करण्यात आली. त्याचबरोबर, येथे असलेल्या संग्रहालयातील काही वस्तू ॲशमोलियन संग्रहालयात तर काही वस्तू पिटस रिव्हर्स संग्रहालयात नेऊन ठेवण्यात आल्या.

भारत हा एक खंडप्राय देश आहे. हा देश केवळ आकारानेच मोठा आहे असे नाही तर विविधतेने नटलेला आहे. या देशावर राज्य करायचे तर उत्तम व्यवस्थापन करू शकतील असे लोक असण्याची निकड इंग्रज राज्यकर्त्यांना जाणवली. त्यासाठी त्यानी इंडियन सिव्हिल सर्विस म्हणजेच आय सी एस निर्माण केली. या माध्यमातून प्रशिक्षण घेऊन आलेले अधिकारी देशाचा गाडा चालवित असत. त्यातील फारच थोडे लोक भारतीय असत. बरेचसे अधिकारी इंग्लंडमध्येच निवडले जात. भारतात पाठविण्यापूर्वी त्यांचे प्रशिक्षण केले जाई. या प्रशिक्षणाचे कार्य याच संस्थेत केले जात असे. भारतीय संस्कृती, भारतीय भाषा, चालिरिती याची माहिती त्यांना करून दिली जात असे. त्यामुळे येथे येण्यापूर्वीच त्यांना भारताची चांगली माहिती झालेली असायची. त्याच्या आधारे येथील व्यवस्थापन ते प्रभावीपणे करू शकत असत. इंग्रजानी सुरू केलेली व्यवस्थापन पद्धत आपण आता देखील पाळत आहोत. त्याचे नामकरण आता 'इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव सर्विस' म्हणजे 'आय ए एस' असे करण्यात आले आहे.

१९४७ ला भारत स्वतंत्र झाल्यावर ही संस्था बंद करण्यात आली. त्यानंतर ही इमारत विद्यापीठाच्या इतिहास विभागाला वापरायला दिली. या विभागाला स्वतंत्र जागा मिळाल्यानंतर त्यानी ही इमारत रिकामी

(पृष्ठ क्र. ३९ वर)

यशस्वी व्यक्ती चेहऱ्यावर नेहमी दोनच गोष्टी ठेवतात. स्मितहास्य व शांतपणा. स्मितहास्य-समस्या सोडवण्यासाठी व शांतपणा-समस्येपासून दूर राहण्यासाठी.

# ओळख वनस्पतींची
# बेल / बिल्वपत्र

*'ओळख वनस्पतींची' या लेखमालेतील अकरावा भाग. 'बेल / बिल्वपत्र' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

मित्रांनो, श्रावण सरींचा हा काळ. पण पाऊस लांबल्यामुळे अजूनही आषाढातच आपण वावरतो आहोत. घरोघरी होत असलेली व्रत-वैकल्ये, उपास-तापास श्रावणच चालू असल्याची जाणीव करून देतात. देवळात मोठमोठ्या रांगा लागलेल्या असतात. फुलविक्रेत्याकडे देखील रांगा लागलेल्या दिसतात. फुलांसोबतच विविध पानांना देखील मागणी असते. गणपतीला वाहण्यासाठी लागणाऱ्या २१ पत्री तर सर्व परिचित आहेत. पण रोजच्या पूजेत अग्रक्रमाने असणारी पाने म्हणजे बेल. फुलवाल्याकडे फुलं मागताना देखील वेल, फुल हा असाच शब्द वापरण्याची पद्धत आहे. बेल म्हणजे बेलाची पाने. इथपर्यंतच बहुतेकांना बेलाची माहिती असते. पूजाअर्चा, व्रतवैकल्ये हा आमच्या जगण्याचा एक भाग होता. आता तो कर्मकांड झाला आहे. वेगवेगळ्या वनस्पती व त्यांच्या औषधी गुणांविषयी लोकांना माहिती असायची. त्या कुठे मिळातात, त्यांना ओळखण्याची रीत तसेच खबरदारी देखील या सर्व गोष्टीची लोकांना या निमित्ताने माहिती व्हायची. या सर्व वस्तू लोक स्वतःच गोळा करायचे, त्यांच्या वापरावर देखील नियंत्रण असायचे. समाजातील फारच कमी लोक यात गुंतले असल्याने मागणी कमी व पुरवठाही मर्यादित. आज नियमितपणे मंदिरात जाणाऱ्यांची संख्या फारच वाढली आहे व बेल फुलांनाही मागणी वाढली आहे. देवपूजेला बाजाराचे स्वरूप आल्यामुळे निसर्गाला ओरबाडण्याचे प्रमाणही वाढले आहे. यात बळी पडणाऱ्यांपैकी एक आहे बेल.

बेल हा मध्यम चणीचा वृक्ष आहे. आकार नियमित नसल्याने लांबून ओळखता येत नाही. उंची १० ते १५ मीटर. खोड खडबडीत व राखाडी रंगाचे. फांद्यांना १ इंच लांब काटे, पाने संयुक्त. बहुदा त्रिदल. पण हे काही पळसासारखे नियमित नाही. काही पर्णदलामध्ये ४ किंवा ५ पाने असतात. पानांचा आकार भालाकार रंग पोपटी हिरवा. लांबी ४ ते ५ सें.मी. गुळगुळीत. मधली पर्णिका देठ असलेली; पण बाजूच्या पर्णिका देठ नसलेल्या. जानेवारी ते जून या काळात झाडावर २ ते ३ सें.मी. आकाराची हिरवट पांढरी, पाच पाकळ्या असलेली फुले येतात. या फुलांना मधूर सुगंध येतो. या काळात खूप मोठ्या संख्येने मधमाशांचा वावर या झाडावर असतो. याला हिरव्या रंगाची लांबोळकी गोल फळे येतात. ही फळे हळूहळू वाढत असल्याने खूप दिवस झाडावर दिसतात. पिकली की छान सोनेरी पिवळ्या रंगाची दिसतात. ही फळे चवीला गोड असूनही चिकटपणामुळे नुसता गर खाण्यास बऱ्याच जणांना आवडत नाही. मात्र यापासून केलेल्या मुरंब्बा व सरबतावर अक्षरशः उड्या पडतात. या झाडाची पाने, साल, मुळे व फळे हे सर्व औषधी गुणांनी युक्त आहेत. याचे मूळ दशमुलारिष्ट या औषधाचा एक भाग आहे.

या झाडाच्या पानापासून केलेला पोटीस नेत्रविकारावर गुणकारी आहे. फुले व सालीपासून सुगंधीत तेल मिळते. फळाचे कवच टणक असल्याने आपटून किंवा त्यावर आघात करूनच ते फोडावे लागते. त्यामुळेच याला इंग्रजीत Stone Apple असेही म्हटले जाते. याचे शास्त्रीय नाव आहे Aegle marmelos. आतील गोड व मऊ चिकट गर विविध आजारांवर औषध म्हणून उपयोगी आहे. जुनाट आमांश विकार, अतिसार, अल्सर,

(पृष्ठ क्र. ३४ वर)

सुखाचे क्षण हे दवबिंदू प्रमाणे असतात. हातात आलेसे वाटतं तेव्हा निसटून गेलेले असतात.

# अमेरिका, आंतरराष्ट्रीय राजकारण, दहशतवाद व सीआयए

*अमेरिकेची गुप्तहेर संघटना 'सीआयए' व आंतरराष्ट्रीय राजकारणाची चर्चा करणारा लेख – संपादक*

सेन्ट्रल इंटेलिजन्स एजेन्सी (सीआयए–CIA) ही अमेरिकेची (अमेरिकेची संयुक्त संस्थाने) गुप्तहेर संघटना होय. ह्या संस्थेचे प्रमुख काम अमेरिकेच्या सरकारसाठी हेरगिरी करणे हे होय. सीआयए जगातील विविध देशांची सरकारे व अतिरेकी संघटनांवर लक्ष ठेवून असते. या व्यतिरिक्त इतर संघटीत गुन्हेगारीमध्ये सामिल असलेल्या व्यक्तींवर व संघटनांवर देखील सीआयएचा डोळा असतो. उदाहरणच द्यायचे झाले तर दक्षिण अमेरिकेतील विविध देशांमधून कार्यरत असलेले मादक पदार्थांचे माफीया व विविध देशांतील खंडणी वसूल करणाऱ्या व इतर गंभीर गुन्ह्यांमध्ये सक्रीय असणाऱ्या (Extortionist and Under world gangs) टोळ्यांची देखील इत्यंभूत माहिती 'सीआयए' सतत गोळा करत असते. या माहितीचा उपयोग अमेरिकेच्या सरकारला केव्हाही आपल्या देशाच्या हितासाठी व रक्षणासाठी करता यावा ही यामागची भूमिका आहे. सीआयएने अमूक एका विशिष्ट प्रकारचीच माहिती गोळा केली पाहिजे असे नाही. त्यामुळेच ही संघटना राजकीय, आर्थिक तसेच सैनिकी प्रकारची म्हणजेच इतर देशांच्या लष्कराच्या वा सैन्याच्या सुसज्जेबाबत देखील माहिती गोळा करत असते. जगातील विविध देश कशाप्रकारे आर्थिक प्रगती साध्य करत आहेत व ते कोणत्या क्षेत्रात जास्त गुंतवणूक करत आहेत, त्याचप्रमाणे ते अमेरिकेच्या जगावरील आर्थिक वर्चस्वास नजिकच्या काळात आर्थिक आव्हान उभे करू शकतात की काय, तसेच त्यांचे राजकीय निर्णय काय आहेत, त्यांच्या राजकीय निर्णयांचा अमेरिकेच्या जागतिक राजकीय प्रभावावर व एकंदरीत आंतरराष्ट्रीय राजकारणावर काय परिणाम होईल; जगाच्या राजकारणात कोणता देश कोणत्या देशाजवळ चालला आहे, कोणता देश कोणत्या देशाच्या दूर जात आहे, त्याचप्रमाणे जगातील कोणत्या देशांना अमेरिका आपली शस्त्रास्त्रे विकून नफा कमावू शकतो, कोणता देश नजिकच्या काळात अमेरिकेच्या जागतिक सैनिकी वर्चस्वास आव्हान देऊ शकतो, या सर्व प्रकारची माहिती सीआयएचे गुप्तहेर जगभरातील विविध देशांमध्ये राहून काढत असतात. अर्थात या सर्व माहितीचा अमेरिकन सरकारला फार मोठ्या प्रमाणात फायदा होतो; किंबहुना आपले जगातील वर्चस्व कायम ठेवण्यात होतो. सीआयए ही सर्व प्रकारची माहिती फक्त गोळा करून थांबत नाही तर या सर्व माहितीचे विश्लेषण करत असते व ह्या विश्लेषणाचे सादरीकरण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष, संसद व इतर केंद्रीय संस्थांना करत असते. सीआयए ज्याप्रमाणे इतर देशांवर हेरगिरी करत असते त्याचप्रमाणे अमेरिकेवर हेरगिरी करणाऱ्या इतर देशांच्या गुप्तहेर संघटनांच्या कारवायांवर लक्ष ठेवून असते; नव्हे तर ती त्यांच्या कारवाया उधळून लावण्यासाठी प्रयत्नरत असते. या प्रकारास इंग्रजीमध्ये 'काऊंटर इंटेलिजन्स' (Counter Intelligence) असे म्हटले जाते. सीआयएची कार्यशैली वा पद्धतीचा अजून एक पैलू 'कोव्हर्ट ॲक्शन' (Covert action) हा होय. 'कोव्हर्ट ॲक्शन' म्हणजे परराष्ट्रांमध्ये होणाऱ्या विविध घटनांवर अमेरिकेचा गुप्तपणे वा नकळतपणे प्रभाव टाकणे होय. यासाठी सीआयए विविध देशांतील वृत्तपत्रे, प्रभावी व्यक्ती इत्यादींसोबत संगनमत करत असते वा त्यांच्या नकळत त्यांचा वापर करून

खरंच काही करायचे तर मार्ग सापडेल. अन् काही करायचे नसेल तर कारण सापडेल.

आपले काम वा उद्दीष्ट पूर्ण करून घेत असते.

सीआयएने गोळा केलेली माहिती अनेकदा गुप्त ठेवली जाते व वर नमूद केल्याप्रमाणे सरकारमधील अतिशय उच्चपदस्थ व्यक्तींना वा संसदेला गरजेनुसार पुरविली जाते. सीआयएची माहिती जमा करण्याची प्रमुख स्त्रोत्रे म्हणजे मानवी गुप्तहेर, ऐकण्यासाठी व बोलण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या (टेलीफोन-दूरध्वनी, मोबाईल फोन-भ्रमणध्वनी इत्यादी) यंत्राद्वारे केल्या जाणाऱ्या संभाषणाच्या रेकॉर्डिंग्ज् (ध्वनीफीती) व हेरगिरीसाठी अमेरिकन सरकारने अंतराळात सज्ज ठेवलेली उपग्रहे होत. जगभरात अमेरिकेचे सर्वात जास्त उपग्रह अंतराळात आहेत असे म्हणणे वावगे ठरणार नाही. हे उपग्रह संभाषण, विविध खेळ, बातम्या इत्यादींचे प्रक्षेपण करण्यासाठी, हवामानाचा अंदाज वर्तविण्यासाठी त्याचप्रमाणे जगातील विविध देशांवर आकाशातून नजर ठेवण्यासाठी वापरले जातात. अवकाश तंत्रज्ञानात अमेरिका हा जगातील 'दादा' होय असे म्हणणे अतिशयोक्ती ठरू नये.

जगात घडणाऱ्या विविध घटनांचे विश्लेषण करणे ही एक सीआयएची मुख्य जबाबदारी होय. या घटनांचे विश्लेषण केल्यानंतर त्या घटनांचा अन्वयार्थ अमेरिकन सत्ताधाऱ्यांना समजावून सांगणे हे देखील सीआयएचेच काम आहे. ह्या कामासाठी 'सीआयए' मध्ये विशेष विश्लेषकांची नेमणूक करण्यात आलेली असते. हे विश्लेषक सीआयए सोबतच संरक्षण, परराष्ट्र, अर्थ व इतर महत्त्वाच्या सरकारी विभागांसाठी काम करणाऱ्या संस्थांनी गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषण करत असतात व अमेरिकेच्या धोरण आखणाऱ्या धुरिणांना हे सर्व विभाग काय काम करत आहेत, कोणते महत्त्वाचे निर्णय केव्हा, का व कशासाठी घेत आहेत याचे आकलन करून देत असतात. हे विश्लेषक अमेरिकेला आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रभाव पाडण्यासाठीच्या संभाव्य गरजा देखील राज्यकर्त्यांच्या लक्षात आणून देत असतात.

अमेरिकेच्या संरक्षणविषयक योजना तसेच सैन्यविषयक गुप्त व अतिमहत्त्वाची माहिती मिळवू पाहणाऱ्या परदेशीय गुप्तहेरांचा समाचार घेणे हे देखील सीआयएचे परम कर्तव्य होय. अमेरिकेशी मैत्री असणारे वा मैत्री नसणारे देश, अमेरिकेची दिशाभूल करण्यासाठी अमेरिकन गुप्तहेरांना चुकीची माहिती तर देत नाहीत ना हे चाचपडून पाहणेसुद्धा सीआयएचे महत्त्वाचे काम आहे.

प्रचार वा अपप्रचार, अनधिकृत सैनिकी कारवाया तसेच अमेरिकेच्या हितसंबंधांना पाठिंबा देणाऱ्या परराष्ट्रीय राजकीय व सैनिकी गटांना गुप्तपणे मदत करणे ही 'कोव्हर्ट ॲक्शन' (Covert action) साठी वापरली जाणारी काही आयुधे होत. शीतयुद्धाच्या काळात सीआयएने तत्कालीन/तेव्हाच्या सोव्हिएत संघाविरुद्ध आघाडी उघडली होती. सीआयएने सोव्हिएत संघाच्या पश्चिम युरोपातील कारवायांना व हस्तक्षेपाला आळा घालण्यासाठी वृत्तपत्रीय प्रचार व सोव्हिएत संघाविरुद्ध मदत करणाऱ्या व्यक्ती व संघटनांना गुप्तपणे पैशाचा पुरवठा करणे अशा अनेक युक्त्यांचा वापर केला होता. शीत युद्धाची सुरुवात दुसरे महायुद्ध संपल्यानंतर १९४५ साली झाली होती. दुसऱ्या महायुद्धापर्यंत इंग्लंड व फ्रान्स या जागतिक सत्ता म्हणून ओळखल्या जात असत. या दोन देशांचे साम्राज्य जगभर पसरलेले होते. आशिया, आफ्रिका इत्यादी विविध खंडांमध्ये या देशांच्या वसाहती होत्या. आपल्या भारत देशात देखील १९४७ सालापर्यंत इंग्लंडची वसाहत होती. २० व्या शतकात जोमाने सुरू झालेल्या स्वातंत्र्य चळवळीमुळे १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळाले. भारताप्रमाणे इतर अनेक देश इंग्लंडच्या वसाहती होते. खुद्द अमेरिका (अमेरिकेची संयुक्त संस्थाने) देखील एकेकाळची इंग्लंडची वसाहत होय. अमेरिकेला इंग्लंडचे आपल्यावरील साम्राज्य/जाचक राजवट उलथवून

माफी मागून झालेली चूक सुधारू शकतो पण माफी मागून तुटलेला विश्वास कधीही मिळत नाही. म्हणून आयुष्यात चुका केल्या तरी चालतील परंतु चुकून सुद्धा कुणाचा विश्वास तोडू नका!

टाकण्यासाठी अक्षरशः युद्ध करावे लागले. या युद्धास 'अमेरिकेचे स्वातंत्र्य युद्ध' वा 'अमेरिकन क्रांती' असे म्हटले जाते (१७७५ ते १७८१). ही क्रांती १७८३ च्या पॅरीसच्या तहानुसार अधिकृतरित्या संपली. या सशस्त्र क्रांतीनंतर अमेरिका स्वतंत्र देश म्हणून अस्तित्वात आला. असो. अशा तऱ्हेने इंग्लंड व फ्रान्स हे देश निदान १९३९ पर्यंत तरी जगावर अधिपत्य गाजवत होते. इंग्लंडचे राजकीय धुरीण तर अभिमानाने, 'आमच्या साम्राज्यावर कधीच सूर्य अस्त पावत नाही' असे म्हणत असत.

दुसऱ्या महायुद्धाची १९३९ साली जेव्हा सुरुवात झाली तेव्हा मित्र राष्ट्रांचे नेतृत्व खऱ्या अर्थाने इंग्लंड व फ्रान्स हे देशच करत होते. मित्र राष्ट्र इटली, जर्मनी व जपान या राष्ट्रांविरुद्ध लढत होते. सुरुवातीच्या काळात अमेरिकेने स्वतःस या युद्धापासून दूर ठेवले. त्याचप्रमाणे सोव्हिएत संघदेखील या युद्धात सहभागी नव्हता. रशियात १९१७ च्या ऑक्टोबर महिन्यात लेनिनच्या नेतृत्वाखाली बोल्शेव्हिक क्रांती झाली व रशियाचा सोव्हिएत संघ झाला. यानंतर तेथे साम्यवादाची हुकुमशाही राजवट निर्माण झाली. लेनिनच्या मृत्यूनंतर (१९२४) जोसेफ स्टॅलिन हा सोव्हिएत संघाचा अध्यक्ष झाला. रशियात साम्यवादी राजवट सुरू झाल्यानंतर इंग्लंड, फ्रान्स व अमेरिकेसारख्या पाश्चिमात्य लोकशाही व भांडवलशाही राष्ट्रांनी त्यास आपला शत्रू मानण्यास सुरुवात केली. इंग्लंड व फ्रान्सला अशी भीती वाटत होती की, रशियातील साम्यवादी राज्यकर्त्यांचे मनसुबे सर्व जगभर साम्यवादाचा प्रसार करण्याचे आहेत व यात बऱ्याच अंशी तथ्य देखील होते. मजेची बाब म्हणजे, १९३० च्या दशकात जर्मनीत सत्तेवर आलेला जर्मनीचा हुकुमशहा ॲडॉल्फ हिटलर हा देखील रशियन साम्यवादाच्या विरोधात होता. हिटलर हा इंग्लंड व फ्रान्सचा नंबर एकचा शत्रू होता. मात्र या सर्वांचा शत्रू सोव्हिएत संघ होता. स्टॅलिन सत्तेवर आल्यानंतर त्याने पंचवार्षिक योजनांचे प्रारूप वापरून सोव्हिएत संघाचा आर्थिक विकास करण्याचा वसा घेतला व प्रामुख्याने जड व अवजड तसेच शस्त्रास्त्र निर्मितीच्या उद्योगांना चालना दिली. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात अगोदरच बहिष्कृत झालेल्या सोव्हिएत संघाची या क्षेत्रात जगाच्या नकळत फार मोठ्या प्रमाणात प्रगती झाली.

अगोदर नमूद केल्याप्रमाणे सुरुवातीस अमेरिका व सोव्हिएत संघ दुसऱ्या महायुद्धापासून दूर राहिले होते. मात्र, १९४१ साली हिटलरने सोव्हिएत संघावर आक्रमण केले व सोव्हिएत संघ दुसऱ्या महायुद्धात मित्रराष्ट्राच्या बाजूने सहभागी झाला. आंतरराष्ट्रीय राजकारण हे कशाप्रकारे वेळेनुसार व गरजेनुसार बदलत असते ह्याचे हे उत्तम उदाहरण होय. इंग्लंड व फ्रान्ससारख्या लोकशाही व भांडवलशाही सत्ता दुसऱ्या महायुद्धात साम्यवादी हुकुमशाही असलेल्या व एकेकाळचा आपला कट्टर शत्रू असलेल्या सोव्हिएत संघाबरोबर खांद्याला खांदा लावून लढत होत्या. येथे 'शत्रूचा शत्रू हा आपला मित्र' या न्यायाने सोव्हिएत संघाचा युद्ध-प्रवेश मित्रराष्ट्रांच्या बाजूने झाला होता.

सोव्हिएत संघास ज्याप्रकारे जर्मनीने डिवचले अगदी त्याचप्रकारे जपानने अमेरिकेस डिवचण्याचे काम केले. जपान हा देश इटली व जर्मनीचा अती पूर्वेकडील (इंग्रजीत ह्या प्रदेशास फार ईस्ट-Far East असे देखील संबोधले जाते. फार ईस्ट म्हणजे अती पूर्वेकडील आशियातील राष्ट्रे होत) मित्र होता. इटली व प्रामुख्याने जर्मनीच्या हिटलरचे मनसुबे हे इंग्लंड व फ्रान्सच्या आफ्रिकेतील वसाहती गिळंकृत करून त्यांच्या साम्राज्याला खिंडार पाडण्याचे होते. तसे पाहता १९ व्या शतकात जर्मनी औद्योगिकीकरणाच्या बाबतीत इंग्लंड व फ्रान्सच्या मानाने थोडाफार पिछाडीवर पडलेला होता. ह्याचे प्रमुख कारण म्हणजे जर्मनी हा देश व इटली हा देश देखील छोट्या-छोट्या राज्यांमध्ये

तुमचे मन सुपीक जमीन आहे आणि तुमचे विचार म्हणजे बीज. तुम्हीच ठरवा तुम्हाला तेथे सुंदर फुलं, फळं देणारे वृक्ष उगवायचे आहेत का फक्त गवत.

विखुरलेले होते. राजकीय ऐक्याच्या अभावी येथील औद्योगिकीकरणाचा व आधुनिकीकरणाचा वेग नाही म्हटलं तरी इंग्लंडसारख्या गेली अनेक वर्षे स्थिर राजकीय स्थिती असणाऱ्या देशापेक्षा कमी होता. मात्र, १८७१ साली जर्मनीचे तत्कालीन पंतप्रधान (Chancellor) ऑटो व्हॉन बिस्मार्क यांच्या नेतृत्वाखाली जर्मनीचे एकीकरण झाल्यानंतर जर्मनीची झपाट्याने विविध क्षेत्रांत प्रगती होण्यास सुरुवात झाली. जर्मनीत हळूहळू औद्योगिकीकरणाची गती वाढली व कारखान्यांची संख्यादेखील वाढत गेली. अशावेळी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील शेवटच्या दोन दशकांत जर्मनीला आपल्या कारखान्यांसाठी कच्चा माल पुरविणाऱ्या व पक्का माल हक्काने विकता येणाऱ्या वसाहतींची गरज भासू लागली. परंतु ह्या वेळेपर्यंत इंग्लंड व फ्रान्सने जगातील अनेक देशांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. त्यामुळे जर्मनीला तेव्हाच उमगले होते की, आता वसाहती निर्माण करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे इंग्लंड व फ्रान्स यांच्या वसाहती त्यांच्याकडून हिसकावून घेणे हा होय. नेमक्या ह्याच कारणामुळे भविष्यात पहिले महायुद्ध (१९१४-१९१८) व दुसरे महायुद्ध (१९३९-१९४५) झालेले आपल्याला आढळते.

जपानच्या बाबतीत देखील जर्मनीप्रमाणेच १९व्या शतकाच्या उत्तरार्धात मेईजी क्रांतीनंतर (१८६८) खऱ्या अर्थाने प्रगती होण्यास सुरुवात झाली. अर्थात, याला मुस्टोहिटो या जपानच्या सम्राटाने हाती घेतलेले विविध उपक्रम व औद्योगिकीकरण व आधुनिकीकरणास दिलेला पाठिंबा ह्या गोष्टी कारणीभूत ठरल्या. जपानला देखील औद्योगिक प्रगती सुरू झाल्यानंतर वसाहतींची गरज भासू लागली. यातूनच पुढे जपानने अतीपूर्वेत आपल्या शेजारील राष्ट्रांवर हल्ले करून त्यांचे प्रदेश काबीज करण्यास सुरुवात केलेली आढळते. जपानच्या ह्या कृत्यांना अमेरिकेचा (अमेरिकेची संयुक्त संस्थाने) नाही म्हटलं तरी सुरुवातीपासूनच विरोध होता. याचे कारण म्हणजे अमेरिकेच्या पश्चिमेकडे व जपानच्या पूर्वेकडे प्रशांत महासागर (Pacific Ocean) आहे. या प्रशांत महासागरातील विविध बेटे व बेटांचा समुदाय (Archipelago) असलेले देश (मार्शल आयलँड्स्, फिलीपाईन्स, इंडोनेशिया इत्यादी) व अतीपूर्वेकडील चीन व कोयिा (हे दोन देश जपानचे पश्चिमेकडील फारच जवळचे शेजारी राष्ट्र होत) यांच्याशी व्यापारी हितसंबंध जोपासण्याचा अमेरिकेचा देखील मनसुबा होता. त्यामुळे जपानच्या अतीपूर्वेकडील व प्रशांत महासागरीय प्रदेशांतील आक्रमक धोरणास अमेरिका कधी उघड तर कधी छूपा विरोध करीत असे. जेव्हा अमेरिकेच्या कमोदोर पेरीने १८५२ साली जपानला भेट दिल्यानंतर जपानची कवाडे खऱ्या अर्थाने जगासाठी उघडली गेली असे म्हणतात. आपल्या असेही लक्षात येते की, सुरुवातीपासूनच त्यांचे संबंध काही सौख्याचे नव्हते. प्रशांत महासागरीय प्रदेश व अती पूर्वेकडील देशांच्या राजकीय पटावर अमेरिका व जपान सुरुवातीपासूनच एकमेकांच्या विरोधात होते. किंबहुना त्यांची धोरणे व भूमिका वेगळ्या होत्या. अशा तऱ्हेने प्रत्येक देश आपापले स्वतःचे हितसंबंध जपण्यात मशगुल वा व्यग्र होता. या सर्व पार्श्वभूमीवर जपानने १९४१ साली अमेरिकेच्या प्रशांत महासागरातील हवाई ह्या बेटरूपी राज्यातील पर्ल हर्बर येथील नौदल तळावर हल्ला का केला याचे कोडे उलगडते. त्याचप्रमाणे ह्या सर्व राष्ट्रांची साम्राज्यवादाची भूक भागविण्यासाठी पहिले व दुसरे महायुद्ध होणारच होते वा अटळ होते हे देखील लक्षात येते. १९४१ साली जपानने अमेरिकेला पर्ल हार्बरवर हल्ला करून डिवचले व दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीच्या काळात इंग्लंड व फ्रान्सविषयी सहानुभूती असणारा व त्यांना वेळ पडल्यास छुपी मदत करणारा अमेरिका आता उघडउघडपणे इंग्लंड व फ्रान्सच्या बाजूने जर्मनी, इटली व जपानविरुद्ध दुसऱ्या महायुद्धात उतरला. प्रामुख्याने अमेरिकेच्या मदतीमुळेच इंग्लंड व

---

ज्याचे कर्म चांगले आहे तो कधी संपत नसतो. सत्कर्मी माणसाला जीवनात अडचणी येतात पण त्या सुटणाऱ्या असतात, याउलट जो दुसऱ्याला अडचणीत आणतो त्याची अडचण आयुष्यभर संपत नाही.

फ्रान्ससारख्या मित्र राष्ट्रांना जर्मनी, इटली व जपानचा दुसऱ्या महायुद्धात पाडाव करता आला. ३० एप्रिल १९४५ रोजी जर्मनीच्या हिटलरने आत्महत्या केली व याच सुमारास म्हणजे २८ एप्रिल १९४५ रोजी इटलीचा हुकुमशहा मुसोलिनीचा देखील इटलीच्या नागरिकांनी वध केला व आफ्रिका व युरोप खंडात दुसऱ्या महायुद्धाची सांगता झाली. परंतु जपान अतीपूर्वेकडे सहजा-सहजी हार मानण्यास तयार नव्हते. इकडे अतिपूर्वेत प्रामुख्याने अमेरिका व जपान दरम्यानच घमासान युद्ध सुरू होते. शेवटी अमेरिकेला उमगले की, जपानला सहज पराभूत करणे शक्य नाही. त्यामुळे अमेरिकने जपानवर अण्वस्त्र हल्ला (Nuclear attack) करण्याचा मानवी इतिहासातील अतिशय धक्कादायक असा निर्णय घेतला. अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा व नागासाकी या दोन शहरांवर अनुक्रमे दिनांक ६ ऑगस्ट १९४५ व ९ ऑगस्ट १९४५ रोजी अणुबाँब टाकले व ही शहरे बेचिराख केली. मानवी इतिहासातील हा सर्वात भीषण हल्ला होता. या अणुबाँब हल्ल्यामुळे हजारो लोक मृत्यूमुखी पडले. अनेक घरे, कारखाने व इमारती नष्ट झाल्या. त्याचप्रमाणे येणाऱ्या अनेक पिढ्यांमध्ये किरणोत्सारामुळे व्यंगत्व वा कुठले ना कुठले विकार झालेले निदर्शनास आले. ह्या अण्वस्त्र हल्ल्यानंतर जपानने नांगी टाकली व दुसऱ्या महायुद्धात हार पत्करली.

अशा तऱ्हेने १९४५ साली दुसरे महायुद्ध संपले. या महायुद्धाने जगाच्या राजकारणात दूरगामी बदल तर घडवून आणलेच, मात्र त्याचबरोबर जगाचा नकाशा देखील बदलला. अनेक नवीन देश अस्तित्वात आले, तर अगोदर अस्तित्वात असलेले देश नष्ट झाले. ह्या युद्धात इटली, जर्मनी व जपान या पराभूत राष्ट्रांचे अतोनात नुकसान होऊन जणू त्यांचा पाठीचा कणाच मोडून गेला. मात्र, इंग्लंड व फ्रान्स यांचा विजय होऊन देखील त्याचा या देशांना विशेष फायदा झाला नाही. उलटपक्षी या देशांनी दुसरे महायुद्ध लढण्यासाठी मोठ्या प्रमाणात आपले राष्ट्रीय स्त्रोत वापरले होते. त्याचप्रमाणे दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान व नंतर ह्या देशांच्या वसाहतींमध्ये जोमाने स्वातंत्र्य चळवळी सुरू होत्या. याची परिणती त्यांच्या वसाहती स्वतंत्र होऊन त्यांच्या साम्राज्याचे विघटन होण्यात झाले. या सर्वांचा परिणाम त्यांच्या आर्थिक स्थितीवर झाला. त्यामुळेच असे म्हटले जाते की, दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्लंड व फ्रान्स यांची जागतिक राजकारणावरची पकड ढिली होऊन हे देश पिछाडीवर पडले व अमेरिका व सोव्हिएत संघ या देशांचे जगातील वर्चस्व वाढले. त्याचप्रमाणे दुसऱ्या महायुद्धानंतर जगात एका विचित्र वादास तोंड फुटले. हा वाद प्रामुख्याने वैचारिक होता व जगामध्ये आपल्या विचार प्रणालीवर विश्वास असणाऱ्या देशांचे संरक्षण करणे व आपल्या विचार प्रणालीच्या विपरीत विचार असणाऱ्या देशास नेस्तनाबूत करणे हे ह्या वादाचे प्रमुख समीकरण होते. या वादास शीतयुद्ध (Cold War) या नावाने संबोधले गेले. शीतयुद्धामुळे संपूर्ण जग दोन गटांमध्ये विभागले गेले. एक गट म्हणजे भांडवलशाही व लोकशाहीमध्ये विश्वास असणाऱ्या देशांचा गट. या गटाचे नेतृत्व अमेरिका करत होता. दुसरा गट हा साम्यवादी हुकुमशाही (Communist Dictatorship) विश्वास ठेवणाऱ्या देशांचा होता व या गटाचे नेतृत्व सोव्हिएत संघ करत होता. हे दोन्ही देश आपापल्या गटातील देशांचे रक्षण करण्यात तर गुंग होतेच; मात्र एकमेकांच्या गटातील राष्ट्रांना देखील शह व काटशह देण्याचे प्रयत्न करत होते. सोव्हिएत संघाने तर युरोप व आशियातील जास्तीत जास्त देशांमध्ये साम्यवादाचा (Communism) प्रसार करण्याचा चंगच बांधला होता. अमेरिका, सोव्हिएत संघाच्या ह्या उपद्व्यापांना सडेतोड उत्तर देण्यास सज्ज झाली होती. या शीतयुद्धातील काही महत्त्वाच्या व हृदयाचा ठोका चुकविणाऱ्या घटना म्हणजे दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनीचे झालेले विभाजन (जर्मनीच्या विभाजनानंतर पश्चिम जर्मनी व पूर्व जर्मनी हे दोन नवीन

जे हवंय त्याच्यासाठी लढण्याची तयारी नसेल तर, जे तुम्ही गमवलंय त्याच्यासाठी रडत बसू नका.

देश अस्तित्वात आले. यापैकी पश्चिम जर्मनीत लोकशाही शासन होते व ते अमेरिकेच्या गटातील राष्ट्र होते व पूर्व जर्मनीमध्ये साम्यवादी हुकूमशाही अस्तित्वात आली व हे राष्ट्र सोव्हिएत संघाच्या अधिपत्याखाली होते. पूर्व जर्मनीची राजधानी बर्लीन हे ऐतिहासिक शहर होते), बर्लीन शहराची पूर्व बर्लीन व पश्चिम बर्लीन अशी विभागणी करण्यासाठी बांधण्यात आलेली जगप्रसिद्ध बर्लीनची भींत, पश्चिम बर्लीन शहराची पूर्व जर्मनी व रशियाने केलेली कोंडी व त्याला उत्तर म्हणून अमेरिकेने त्या शहरात हवेतून विविध उपयोगी वस्तूंचा केलेला वर्षाव, अतिपूर्वेकडील कोरीयन युद्ध (Korean War) व त्यातूनच कोरिया या देशाचे उत्तर कोरिया व दक्षिण कोरिया या दोन देशांमध्ये झालेले विभाजन, सीआयएने क्यूबातील फिडेल कॅस्ट्रो या राष्ट्राध्यक्षाची राजवट संपुष्टात आणण्यासाठी घडवून आणलेला हल्ला (ह्या हल्ल्यास 'बे ऑफ पिग्ज् ॲटॅक' – Bay of Pigs Attack असे संबोधले जाते), रशियाने क्यूबा ह्या अमेरिकेच्या अतिनजीक असलेल्या देशाला केलेला क्षेपणास्त्रांचा (Missiles) पुरवठा व याला उत्तर म्हणून अमेरिकेच्या तत्कालीन जॉन एफ् केनेडी या राष्ट्राध्यक्षांनी रशियावरून क्युबाकडे क्षेपणास्त्र घेऊन जाणाऱ्या जहाजांची अटलांटिक महासागरात केलेली कोंडी या व इतर अनेक घडामोडी म्हणजे अंगावर रोमांच आणणाऱ्या घटना होत. या प्रत्येक घटनेच्या प्रसंगी जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे की काय अशा प्रकारचे भयावह वातावरण निर्माण झाले होते. या प्रत्येक घटनेवर विशेष लेख वा पुस्तक देखील लिहिले जाऊ शकते असे म्हणणे म्हणजे अतिशयोक्ती होणार नाही.

शीतयुद्धाचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे अमेरिका व रशिया (सोव्हिएत संघ) यांच्यातील जीवघेणी शस्त्रास्त्र स्पर्धा हे होय. हे दोन्ही बलाढ्य देश या काळात जास्तीत जास्त हानी पोहचवू शकणाऱ्या संहारक शस्त्रांची निर्मिती करण्यात गुंतलेले होते. यामध्ये नवनवीन प्रकारची लढाऊ विमाने, क्षेपणास्त्रे, लढाऊ वा युद्धासाठीची विमाने वाहून नेऊ शकणाऱ्या व समुद्रातून क्षेपणास्त्र हल्ला करू शकणाऱ्या युद्धनौका, अद्ययावत व अण्वस्त्रधारी पाणबुड्या यांचा समावेश होता. अशा ह्या संकटांची मालिका निर्माण करणाऱ्या शीतयुद्धाच्या दरम्यान अमेरिकेची 'सीआयए' ही गुप्तहेर संघटना गप्प बसली असेल तर नवल. या काळात वर नमूद केलेल्या घटनांमध्ये सीआएचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभाग होता. त्याचप्रमाणे सोव्हिएत संघाच्या गुप्तहेर संघटनांना प्रामुख्याने 'केजीबी' (KGB – ही रशियाची गुप्तहेर संघटना होती) शह व काटशह देऊन त्यांच्या कारवायांवर लक्ष ठेवण्याच्या व रशियाचे मनसुबे उधळून लावण्याच्या कामात 'सीआए' चांगलीच गुंतली होती. किंबहुना शीतयुद्धाची परिणती म्हणून व रशियासारख्या बलाढ्य शत्रूस सडेतोड उत्तर देण्यासाठीच अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष हॅरी एस. ट्रूमन व अमेरिकेच्या संसदेने १९४७ च्या नॅशनल सेक्युरिटी ॲक्टनुसार (National Security Act.) 'सीआयए'ची निर्मिती केली होती.

हॅरी ट्रूमन हे अमेरिकेच्या इतिहासातील सर्वात लोकप्रिय म्हणता येतील अशा फ्रँकलीन डी. रुझवेल्ट (Franklin D. Roosevelt) ह्या अध्यक्षांचे उत्तराधिकारी होत. १९२९ साली अमेरिकेत आर्थिक महामंदी आली व या महामंदीचा फटका सगळ्या जगाला बसला. अमेरिकेत तर होत्याचे नव्हते झाले. अनेक उद्योग व बँका दिवाळखोरीत निघाल्या तर हजारो लोक रस्त्यावर आले. अशा ह्या बिकट आर्थिक परिस्थितीतून अमेरिकेला बाहेर काढणारे व आर्थिक प्रगतीची घडी पुन्हा एकदा व्यवस्थित बसवणारे फ्रँकलीन डी. रुझवेल्ट त्यावेळी अमेरिकन लोकांमध्ये कमालीचे लोकप्रिय झाले होते. त्यांनी आपल्या 'न्यू डील' (New Deal) या आर्थिक

कार्यक्रमाच्या माध्यमातून अमेरिकेची अर्थव्यवस्था पूर्ववत रुळावर आणण्याचे शिवधनुष्य लिलया पेलले होते. त्यामुळेच १९३२-१९३३ पासून ते लगातार अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून येत होते. त्यांनी १९३२ सालची निवडणूक जिंकली व ४ मार्च १९३३ रोजी पदभार स्विकारला. त्यांनी ४ मार्च १९३३ पासून १२ एप्रिल १९४५ एवढा प्रदीर्घ काळ म्हणजेच १२ वर्षे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाचे पद भूषविले.

फ्रँकलीन रुझवेल्ट यांनी आपल्या कारकिर्दीत अगोदर नमूद केल्याप्रमाणे अमेरिकेला आर्थिक महामंदीच्या गर्तेतून बाहेर काढले. त्यांनी अमेरिकन जनतेच्या मनात आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी 'फायरसाईड चाटस्' (Fireside Chats) नामक नवीन उपक्रम सुरू केला. फायरसाईड चाटस् म्हणजे दुसरे तिसरे काहीही नसून राष्ट्राध्यक्ष रुझव्हेल्ट रेडिओवरून अमेरिकन जनतेला उद्देशून भाषण करत असत व त्यातून लोकांना सरकारच्या विविध ध्येय-धोरणांविषयी माहिती देत असत. रेडिओवरील अशा प्रत्येक कार्यक्रमानंतर वा भाषणानंतर राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांना पाठिंबा दर्शविणारी हजारो पत्रे येत असत. या पत्रांचा फायदा रुझवेल्ट यांना संसदेत अनेक कायदे पास करून घेण्यासाठी व विरोधकांची तोंडे बंद करण्यासाठी होत असे. याच धर्तीवर आपले सध्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या 'मन की बात' या कार्यक्रमाद्वारे भारतीय जनतेशी संवाद साधताना आढळतात. १९४४ च्या निवडणूकीत फ्रँकलीन रुझवेल्ट यांनी हॅरी ट्रूमन यांना आपले उपराष्ट्राध्यक्ष पदाचे प्रतिनिधी वा उमेदवार म्हणून घोषित केले. फ्रँकलीन रुझव्हेल्ट ही निवडणूक जिंकून अध्यक्ष झाले तर ट्रूमन उपराष्ट्राध्यक्ष बनले. त्यामुळेच १२ एप्रिल १९४५ रोजी फ्रँकलीन रुझव्हेल्ट यांचे निधन झाल्यानंतर अमेरिकेच्या राज्यघटनेनुसार उपराष्ट्राध्यक्ष, हॅरी एस्. ट्रूमन हे अमेरिकेचे ३३ वे राष्ट्राध्यक्ष बनले. ८ मे १९४५ रोजी युरोप व आफ्रिकेत दुसरे महायुद्ध संपले. मात्र अतिपूर्वेकडे जपानने हार मानलेली नव्हती. हॅरी एस्. ट्रूमन यांच्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या कारकिर्दीचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी अमेरिका व जगाच्या राजकारणावर दुरगामी परिणाम करणारे घेतलेले निर्णय हे होय. ह्यांनीच जपानवर अणुबाँब टाकण्याच्या आदेशावर सही केली. तसेच यांच्याच पुढाकाराने शीतयुद्धाच्या दरम्यान रशियाबरोबर दोन हात करण्यासाठी अनेक निर्णय घेण्यात आले. ह्या निर्णयापैकी एक म्हणजे 'सीआए'ची स्थापना हा एक निर्णय होय. 'नॉर्थ अटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन' (नाटो - NATO) सारखे मित्र राष्ट्रांशी केलेले सुरक्षा करार, दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपातील देश सोव्हिएत संघाच्या साम्यवादाकडे आकर्षित होऊ नयेत म्हणून त्यांना आर्थिक मदत देण्यासाठी आखलेली व राबविलेली मार्शल योजना (Marshall Plan) असे अनेक धाडसी निर्णय ट्रूमन यांनी घेतलेले आढळतात. अमेरिकेच्या राजकीय संरचनेवर परिणाम करणारी ट्रूमन यांच्या काळातील अजून महत्त्वाची घटना वा निर्णय म्हणजे अमेरिकेच्या राज्यघटनेतील २२ वी दुरुस्ती हा होय. या घटना दुरुस्ती नुसार कुठल्याही व्यक्तीस येथून पुढे फक्त दोनच वेळा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनता येईल अशा आशयाची तरतूद करण्यात आली. ह्या अगोदर असे बंधन नव्हते. त्यामुळेच फ्रँकलीन डी. रुझव्हेल्ट ह्या घटना दुरुस्तीपूर्वी तब्बल चार वेळा राष्ट्राध्यक्ष बनू शकले होते. अशाप्रकारे ट्रूमन यांच्या काळात शीतयुद्धास तोंड फुटले व 'सीआयए'चे बारसे झाले.

१९९१ साली सोव्हिएत संघाचे विघटन झाले व साम्यवादाचे त्या देशातून उच्चाटन झाले. त्यामुळे 'सीआए'ला आता रशियाच्या 'साम्यवादी कारवायांना' रोखण्याचे आव्हान नव्हते. मात्र, सोव्हिएत संघातून विघटीत होऊन तयार झालेली राष्ट्रे व त्यातील सर्वात मोठे राष्ट्र रशिया यांच्यावर 'सीआयए' लक्ष ठेवून असते

हे जगजाहीर असे गुपीत आहे.

शीतयुद्धा दरम्यान व नंतर तसेच आजतागायत जगामध्ये अण्वस्त्रांचा (Nuclear Weapons) व अण्वस्त्र बनविण्याच्या तंत्रज्ञानाचा (Nuclear Technology) प्रसार होऊ नये यासाठी 'सीआयए' कार्यरत आहे. त्यामुळेच सुरुवातीपासून चीन, पाकिस्तान, इराण, उत्तर कोरिया असे देश अण्वस्त्रांच्या दृष्टीने सीआयएच्या 'रडारवर' आहेत. अण्वस्त्रांच्या बाबतीत अगदी भारतावर देखील अमेरिकेची व त्या अनुषंगाने 'सीआयएची' करडी नजर होती हे देखील जगजाहीर गुपीत आहे असे म्हणणे वावगे ठरू नये. त्यामुळेच अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारच्या काळात १९९८ सालच्या 'मे' महिन्यात जेव्हा भारताने दुसऱ्यांदा अणू चाचण्या घेऊन आपणही अण्वस्त्रधारी राष्ट्र आहोत व अण्वस्त्रधारी असण्याची जबाबदारी चांगल्या तऱ्हेने जाणतो हे घोषित केल्यावर अमेरिकेची भारतावर खप्पा मर्जी झाली होती. सध्या आपले अमेरिकेसोबतचे संबंध झपाट्याने सुधारत आहेत व ह्या दोन देशांमधील मैत्रीपूर्व संबंध वृद्धिंगत होत आहेत यात काही वाद नाही.

'सीआयए' ही संस्था साधारणतः पुढील पाच शाखांद्वारे कार्यरत असते – डायरेक्टोरेट ऑफ ऑपरेशन्स (Directorate of Operations), डायरेक्टोरेट ऑफ ॲनालिसीस (Directorate of Analysis), डायरेक्टोरेट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी (Directorate of Science and Technology), डायरेक्टोरेट ऑफ सपोर्ट (Directorate of Support) व डायरेक्टोरेट ऑफ डिजीटल इनोव्हेशन (Directorate of Innovation). अगोदर नमूद केल्याप्रमाणे राष्ट्राध्यक्ष हॅरी एस. ट्रूमन यांच्या कारकिर्दीत १९४७ मध्ये नॅशनल सेक्युरीटी ॲक्ट– राष्ट्रीय सुरक्षा कायद्यान्वये (National Security Act) 'सीआयए'ची स्थापना झाली. या कायद्यान्वये डायरेक्टर ऑफ सेंट्रल इंटेलिजन्स (Directorate of Central Intelligance - DCI) हे पद देखील निर्माण करण्यात आले व हे पद भूषविणारी व्यक्ती म्हणजेच 'सीआयएची' प्रमुख असणार अशी तरतूद देखील या कायद्यात होती. हे पद भूषविणाऱ्या व्यक्तीची मुख्य जबाबदारी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना सुरक्षेच्या दृष्टीने हेरगिरी बाबतची इत्यंभूत माहिती व सल्ला देणे ही होती.

कोणत्याही देशाच्या गुप्तहेर संघटनांना एका गोष्टीबाबत फार काळजी घ्यावी लागते व ही गोष्ट म्हणजे आपल्या संघटनेतील एखादी व्यक्ती वा गुप्तहेर हा आपल्या स्पर्धक वा शत्रू राष्ट्राच्या गुप्तहेर संघटनेशी संगनमत करून फितूर झाला आहे की काय ही होय. उदाहरणच द्यायचे झाले तर ब्रिटनच्या 'एम. आय.–६' ह्या गुप्तहेर संघटनेचा चा किम फिल्बी हा गुप्तहेर सोविएत संघाची गुप्तहेर संघटना 'केजीबी'शी सामील झाला होता. किम फिल्बी हा 'एम. आय.–६' च्या माध्यमातून अमेरिकेच्या 'सीआयए' सोबत संपर्कात होता. कालांतराने फिल्बी हा 'केजीबी'ला सामील आहे हे ब्रिटिशांच्या व अमेरिकन लोकांच्या लक्षात आले. हा ब्रिटन व अमेरिकेच्या राज्यकर्त्यांना व 'एम. आय.–६' व 'सीआयए' ला फार मोठा धक्का होता. फिल्बीने काही काळ अमेरिकेत देखील व्यतीत केला होता. अमेरिकेत असताना फिल्बीचा संबंध 'सीआयए' च्या उच्चपदस्थांसोबत आलेला होता. एकदा तर असा प्रसंग आला होता की, फिल्बिला संशय आला होता की, आपण 'केजीबी' चे हस्तक आहोत याची 'एम. आय.–६' व 'सीआयए' ला भनक लागली असावी. फिल्बीने ह्या प्रसंगी 'त्याचा 'कॅमेरा' व इतर साहित्य नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. अखेर १९६३ साली फिल्बी सोविएत संघात कायमचा स्थायिक झाला व त्या देशाची राजधानी 'मॉस्को' हे शहर त्याचे कायमचे घर बनले. फिल्बीचा ११ मे १९८८ रोजी सोविएत संघात मृत्यू झाला व रशियाच्या सरकारने त्याचा शाही इतमामात दफनविधी वा अंत्यसंस्कार केला. यावरून फिल्बी हा सोविएत संघाच्या दृष्टीने किती महत्त्वाचा गुप्तहेर होता हे

अधोरेखित होते. तसेच त्याने किती मोठ्या प्रमाणात अमेरिका व ब्रिटन विषयीची अतिसंवेदनशील व महत्त्वाची माहिती सोविएत संघाला दिली असेल याची प्रचीती येते. येथे एक मजेशीर बाब नमूद करावीशी वाटते व ती अशी की, फिल्बीचा जन्म १ जानेवारी १९१२ रोजी भारतातील तत्कालीन पंजाब प्रांतातील अंबाला येथे झाला होता. फिल्बीचे वडील हॅरी सेंट जॉन फिल्बी हे त्या काळात ब्रिटिशांच्या अधिपत्याखालील भारतीय प्रशासकीय सेवेत होते. फिल्बीच्या वडिलांची पार्श्वभूमी पाहिल्यावर देखील फिल्बीच्या मनातील वैचारिक वादळाची व फिल्बी असा का वागला असावा याची प्रचीती येते. फिल्बीची कारकीर्द, जडणघडण व त्याचा देशद्रोह हा एका नवीन लेखाचा विषय होऊ शकतो.

आर्थिक प्रगतीच्या बाबतीत अमेरिकेचा स्पर्धक असणाऱ्या देशांवर देखील 'सीआयए' हेरगिरी करत असते. जगाच्या राजकारणात वरचष्मा ठेवण्यासाठी आर्थिक प्रगतीच्या क्षेत्रात देखील अग्रेसर राहणे महत्त्वाचे ठरते. त्यामुळे अमेरिका आपल्याशी आर्थिक, औद्योगिक व वैज्ञानिक क्षेत्रात स्पर्धा करणाऱ्या देशांवर लक्ष ठेऊन असते. ह्या कामात अर्थातच 'सीआयए'चा सिंहाचा वाटा असतो. 'सीआयए' ने १९९१ साली जपान सारख्या राष्ट्रातील सोनी, होंडा, मितसुबीशी अशा कंपन्यांच्या व्यवस्थापन बोर्डात आपले हेर पेरण्याचा प्रयत्न केला होता. तसे पाहता अमेरिका व जपान या दोन देशांदरम्यान दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळापासून चांगले राजकीय संबंध प्रस्थापित झाल्याचे निदर्शनास येते. असे असले तरी, हेरगिरीच्या बाबतीत 'सीआयए' ने जपानला देखील आपल्या 'रडार' वर ठेवल्याचे दिसते वा अधोरेखित होते. हे सगळे वाचल्यावर आपल्या एवढे मात्र निश्चितपणे लक्षात येते की, हेरगिरीचे जग अतिशय आगळे वेगळे व अजब असते.

इसवी सन २००४ मध्ये राष्ट्राध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू बुश ज्यूनियर यांच्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या कारकिर्दीत इंटेलिजन्स रिफॉर्म अँड टेररीझम प्रिव्हेनशन अ‍ॅक्ट (Intelligence Reform and Terrorism Prevantion Act of 2004) पास करण्यात आला. ह्या कायद्यानुसार डायरेक्टर ऑफ नॅशनल इंटेलिजन्स (Director of National Intelligence-DNI) हे पद तयार झाले व ह्या पदावरील व्यक्तीला डायरेक्टर ऑफ सेंट्रल इंटेलिजन्स (Director of Central Intelligence) च्या काही जबाबदाऱ्या देण्यात येऊन सीआयएसाठी वेगळ्या डायरेक्टरचे वा संचालकाचे प्रयोजन करण्यात आले. या वेगळ्या अधिकाऱ्यास डायरेक्टर ऑफ सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सी (Director of Central Intelligence Agency) असे संबोधले गेले. सीआयएचा डायरेक्टर वा संचालक हा सीआयएचे खऱ्या अर्थाने काम पाहतो व डायरेक्टर ऑफ नॅशनल इंटेलिजन्स हा अधिकारी त्याचा वरिष्ठ म्हणून काम पाहात असतो.

सीआयएचे सर्व काम प्रामुख्याने डायरेक्टर ऑफ सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सी ह्या अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली चालत असते. त्याची मुख्य जबाबदारी वा काम म्हणजे 'सीआयए' मध्ये विविध खात्यांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींना मार्गदर्शन करणे व अमेरिकेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हेरगिरी करवून घेऊन गुप्त माहिती गोळा करणे हे होय. या व्यतिरिक्त अमेरिकेची सुरक्षा व हेरगिरीबाबत अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी व डायरेक्टर ऑफ नॅशनल इंटेलीजन्स ह्या वरिष्ठ अधिकाऱ्याने वेळोवेळी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनानुसार काम करणे हे देखील डायरेक्टर ऑफ सीआयएचे कर्तव्य आहे. सीआयएच्या डायरेक्टरला त्याच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी वा राष्ट्राध्यक्षांनी सुचना केलेली कामगिरी पूर्ण करण्यासाठी 'सीआयए'चा हजारोंचा कर्मचारी वर्ग मदत करत असतो. 'सीआयए' ही जगातील अशी गुप्तहेर संघटना आहे की, जी मानवी गुप्तहेरांसोबतच हेरगिरी करण्यासाठी जास्तीत जास्त प्रमाणात अद्ययावत

विज्ञान व तंत्रज्ञानाचा उपयोग वा वापर करत असते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष, डायरेक्टर ऑफ सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सी यांची नियुक्ती करत असतात. सीआएच्या डायरेक्टरना वा संचालकांना मदत करण्यासाठी एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर (Executive Director- कार्यकारी संचालक) व विविध विभागांचे डेप्युटी डायरेक्टर (Deputy Director- उपसंचालक) असतात.

सीआयएचे मुख्यालय अमेरिकेच्या पूर्वकिनाऱ्यावरील व्हर्जिनिया या राज्यातील लँगले (Langley) या ठिकाणी आहे. व्हर्निनिया हे राज्य अमेरिकेच्या सर्वात जुन्या राज्यांपैकी एक आहे. जेव्हा ग्रेटब्रिटन मधील लोकांनी अमेरिकेत १३ वसाहती स्थापन केल्या. त्यापैकी एक वसाहत व्हर्जिनिया ही होती. अमेरिकेच्या स्वातंत्र्य युद्धादरम्यान वा अमेरिकेच्या क्रांती दरम्यान अमेरिकन सैन्याचे ब्रिटिश सैन्याविरुद्ध नेतृत्व करणारे जॉर्ज वॉशिग्टन (George Washington) हे मूळचे व्हर्जिनिया या राज्यातीलच होते. अमेरिकेला जॉर्ज वॉशिग्टंनच्या कुशल नेतृत्वाखाली ब्रिटिश सैन्याचा पाडाव करता आला. मजेची बाब म्हणजे ह्या क्रांती युद्धादरम्यान ब्रिटिशांच्या सैन्याचे नेतृत्व लॉर्ड कॉर्नवॉलीस (Lord Cornwallis) यांच्याकडे होते. लॉर्ड कॉर्नवॉलीस अमेरिकेत पराभूत झाल्यानंतर १८ व्या शतकाच्या शेवटच्या दशकाच्या काळात त्याची नियुक्ती भारतात करण्यात आली होती. लॉर्ड कॉर्नवॉलीस अमेरिकेत हरला मात्र भारतात तो अत्यंत यशस्वी ठरला व त्याने प्रामुख्याने टिपू सुलतानचा पाडाव करून दक्षिण भारतातील (कर्नाटक-म्हैसूर) बराचसा प्रांत काबीज केलेला आढळतो. असो; जॉर्ज वॉशिंग्टनपुढे चालून अमेरिकेची संयुक्त संस्थाने (अमेरिका-United States of America) या नव्याने निर्माण झालेल्या राष्ट्राचे पहिले राष्ट्राध्यक्ष बनले. ते आजही अमेरिकेत खूप लोकप्रिय आहेत व अमेरिकेची जनता त्यांच्या स्मृतींना उजाळा देत असते. 'सीआयए' च्या लँगले येथील मुख्यालयाच्या इमारतीची रचना (Design) न्यू यॉर्क स्थित हॅरीसन अँड ॲब्रामोव्हिटज् (Harrison and Abramovitz) या वास्तुविशारद कंपनीने (संस्थेने) १९५० च्या दशकात केली होती. साधारणतः १९५३ ते १९६१ या काळात 'सीआयए'चे प्रमुख पद भुषविणाऱ्या ॲलन डल्लेस (Allen Dulles) यांच्या स्वप्नातून 'सीआयए'चे लँगले येथील मुख्यालय साकारले गेले असे म्हटले जाते. त्यांची अशी इच्छा होती की सीआयएच्या अधिकाऱ्यांना महाविद्यालयीन प्रांगण व कार्यशैलीसारख्या वातावरणात काम करता यावे व त्याचबरोबर त्यांचा इतर लोकांशी जास्त संपर्क येता कामा नये. याचबरोबर सीआयएचा कर्मचारी वर्ग सुरक्षित वातावरणात राहावा असे देखील त्यांचे मत होते. त्याचप्रमाणे सीआयएचे मुख्यालय अमेरिकेच्या राज्यकर्त्यांपासून जास्त दूर देखील राहू नये अशी त्यांची भूमिका होती. ॲलन डल्लेस (Allen Dulles) यांचे हे विचार पाहता लँगले हे ठिकाण किती योग्य आहे ते जाणवते. लँगले (Langley) हे ठिकाण अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन डीसी (Washington DC) या शहरापासून अवघ्या आठ मैलांवर आहे. येथे एक बाब नमूद करणे आवश्यक आहे, ती म्हणजे आपण आतापर्यंत ज्या मुख्यालयाच्या इमारतीचा उल्लेख केला तिला ओरिजनल हेडक्वॉर्टर्स बिल्डिंग (Original Head Quarters Building - OHQ) असे म्हणतात. या इमारतीचे काम ३ नोव्हेंबर १९५९ साली सुरू झाले व मार्च १९६१ मध्ये पूर्ण झाले. या इमारतीचे क्षेत्रफळ १४,००,००० चौरस फूट एवढे आहे.

(लेखाचा उर्वरीत भाग पुढील अंकात...)

**सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

•••

# मूल्यवेध-५: त्वरा

*मानवी जीवनात असलेले 'त्वरे'चे महत्त्व लेखात विशद केले आहे – संपादक*

'त्वरा' म्हणजे घाई. गडबड. लगबग. हल्लीच्या युगात तर घाई हा जणू परवलीचा शब्दच झालेला आहे. विसाव्या शतकातील गाण्यांची चित्रिकरणे, एकविसाव्या शतकातील चित्रिकरणांच्या मानाने मंद भासतात. नाचाच्या एकाच कालावधीच्या चित्रिकरणात, त्याकाळी जर वीस पावले उचलली जात असतील, तर हल्लीच्या तेवढ्याच कालावधीच्या चित्रिकरणांत किमान चाळीस पावले उचललेली आढळतील. लगबग नसलेल्या मानवी हालचाली हल्ली कंटाळवाण्या (बोअरिंग) वाटू लागलेल्या आहेत. गेल्या काही शतकांत मानवाच्या विकासास गती प्राप्त झालेली आहे. वयात येता येता शिकाव्या अशा असंख्य गोष्टी उपलब्ध झालेल्या आहेत. स्वाभाविकतःच मर्यादित असलेल्या आयुष्यकालात, त्या सर्व शिकून घेऊन, त्यांचा समुचित वापर करून घेऊन, संपन्न अन् बहारीचे आयुष्य जगण्याची प्रत्येकाचीच आकांक्षा असते. म्हणूनच मग सुरू होते लगबग. अगदी कुमारावस्थेपासून तर युवा, प्रौढ, वयस्क, वृद्ध आणि अतिवृद्ध अवस्थांपर्यंत माणसाच्या मनावरील लगबगीचे गारूड कमी होताना दिसत नाही.

दळणवळणांच्या साधनांना जसजशी गतीमानता आली, तसतशी पर्यटनास बरकत येत गेली. आदि शंकराचार्यांनी समग्र भारतवर्षाचे पदभ्रमण केले. त्याला संपूर्ण बारा वर्षे लागली होती. स्वामीनारायणांनी देश पायी फिरून अनुभवला, त्यालाही पूर्ण बारा वर्षे लागली होती. आजमितीला सार्वत्रिक निवडणुकांच्या प्रचारार्थ नरेंद्र मोदींनी सर्व देशभरातील असंख्य स्थानांना केवळ महिन्या–दोन महिन्यांच्या प्रचारकालातच पिंजून काढले होते. विमाने आणि चक्रपंखींच्या (हेलिकॉप्टरांच्या) साहाय्यानेच हे शक्य होऊ शकले. सत्त्वर अनुभवसंपन्न होण्याची दालनेच जणू ह्यामुळे खुली झाली. सामान्य पर्यटकही हल्ली सहजपणे ईशान्य भारत फिरून येत आहे. अंदमानातही सुट्ट्या साजऱ्या करण्यास जाऊ शकत आहे. हजारो किलोमीटर अंतरे काही तासांत पार करवणारी वाहने आज उपलब्ध आहेत. औरंगजेब बादशहास मात्र औरंगाबादेस साधा संदेश पोहोचविण्याकरता आग्र्याहून सांडणीस्वार (ऊंटावर स्वार झालेला दूत) पाठवावा लागला होता. तोही सुमारे दोन महिन्यांनंतरच ईप्सितस्थळी संदेश पोहोचवू शकला होता. इथे हे लक्षात घेतले पाहिजे की, उंट हेच त्या काळी सर्वात गतीमान वाहन समजले जात होते.

वाहन व्यवहारांत जशी क्रांती 'त्वरे' पायी निर्माण झाली; थेट तशीच क्रांती 'वेळाचे महत्त्व' जाणून घेतल्याने मानवी अर्थव्यवहारांनाही प्राप्त झाली. त्याची कहाणीही खूप मनोरंजक आहे. काही वर्षांपूर्वी एक हर्षद मेहता नावाचे गृहस्थ भांडवली समभागांच्या (शेअर्स) व्यवहारांत कार्यरत होते. त्यांच्या मनात एक संकल्पना स्फुरण पावली. समभागांच्या व्यवहारांत दररोज कोट्यावधी रुपयांचे व्यवहार होत असत. ज्याचे हाती खेळते भांडवल असे, तो बाजारात प्रचंड प्रमाणात उलाढाली घडवून आणत असे. त्यांवर आधारित नफाही कमावत असे आणि श्रीमंतही होत असे. मात्र खेळते भांडवल मिळवावे तरी कसे? निदान दिवसभर तरी ते बाळगावे कसे? आणि दिवस–अखेरीस ते परतवूनही टाकले तरी त्याद्वारे प्राप्त केलेला नफा मात्र पदरी पाडून घ्यावा कसा? ह्या विचारांनी त्यांचे मन व्यापून टाकले. त्या काळी बँका जे कर्ज देत असत त्यावरील व्याज

महिन्या महिन्यांनी आकडेमोड करून निश्चित केले जाई व वसूलही केले जाई. मात्र सकाळी पैसा घेतला आणि संध्याकाळी जर परत केला तर, दिवस-अखेरीस कर्ज शून्यच राहत असे आणि त्यावर बँकेस कुठलेही व्याज द्यावे लागत नसे. हर्षद मेहता मग आपले बँकांपाशी असलेले सर्व वजन वापरून, दररोज सकाळी लाखो रुपये कर्जाऊ घेत असे. अगदी राजरोस वैध व्यवहार करून. मग दिवसभर वायदे बाजारात ते खेळते भांडवल वापरून असंख्य व्यवहार करत असे. चिक्कार नफाही कमावत असे. दिवस-अखेरीस मात्र घेतलेले ते सर्व कर्ज तो बँकांना न चुकता परत करून टाकी. ह्यामुळे झाले काय की, त्याला जरी दिवसभरात प्रचंड लाभ होत होता, तरी त्याचेवरील कर्ज मात्र कायम शून्यच राही. बँकांचाच पैसा वापरून तो स्वतःचा स्वार्थ साधू लागला. अर्थसंस्थांना मग हळूहळू जाग आली. त्यांना हा व्यवहार उचित नसल्याचे लक्षात आले. कुणी काळाचे मोल जाणून, एवढ्या सत्त्वर हजारो व्यवहार करून पैसे कमावेल, असा विचारही तोपर्यंत कुणीच केलेला नव्हता. म्हणून प्रचलित अर्थ-विषयक कायद्यातच अशा तथाकथित गैर-वापरास प्रतिबंध करण्याची तरतूद नव्हती. ती पुढे करण्यात आली. प्रशासनही काळाचे मोल जाणू लागले. मग बँका दररोजचे व्याज देऊ लागल्या. त्या व्याजावर व्याज मिळवण्याचे लगबगीचे व्यवहारही आता सुरू झालेले आहेत. अशा प्रकारच्या आर्थिक लगबगीने आज मानवी जीवन ढवळून निघालेले दिसून येत आहे.

लगबग नेहमीच वांच्छनीय असते असे नाही बरे. किंबहुना स्वाभाविक लगबगीस रोख लावूनही मनुष्याने आपला विकास साधून घेतल्याची असंख्य उदाहरणे आहेत. वानगी दाखल इथे आपण दोन उदाहरणांचा विचार करू.

असे हे जगाचे फिरे चक्र बाळा । हिवाळा, उन्हाळा, पुन्हा पावसाळा ।।

अशाप्रकारे सृष्टीवरचे जलचक्र कार्यान्वित असताना, पाऊसकाळात उंच पर्वतांवर धुवाँधार वर्षा होते. कड्यावरून उड्या टाकत, प्रचंड जलौघ झपाट्याने समुद्राकडे झेपावतात. अल्पावधीतच पाऊसकाळ लयास जातो. नद्या, तलावांतील जलपातळी उतारास लागते. पाणवठे कोरडे होण्याच्या प्रक्रिया सुरू होतात. यथावकाश पाण्याची कमतरता भासू लागते. ग्रीष्मात तर पाण्याचा दुष्काळही पडतो. अवर्षणाने तापमान वाढू लागते. अविरत वाढत्या जनसंख्येला मग पाणी पुरवावे तरी कसे? ही समस्या सोडवताना मनुष्याने मग पाऊसकाळात झपाट्याने सागराकडे झेपावणाऱ्या पाण्यास रोखण्यासाठी पाण्याकरता अडवा, जिरवा, वाचवा, मुरवा धोरण सुरू केले. जलसंधारणाचे असंख्य कार्यक्रम हाती घेतले. अनेक धरणे बांधली. बंधारे बांधले. पाणलोटक्षेत्रे विकसित केली. जलयुक्त शिवार योजना अंमलात आणली. ह्या सगळ्यांचे उद्दिष्ट मात्र एकच. पाण्याच्या सागराप्रतीच्या प्रवासाची 'त्वरा' कमी करणे. पाण्यास रोखणे. पाण्याच्या स्वाभाविक 'त्वरे'स लगाम घालून मनुष्याने आपले जीवन सुखकर करून घेतले आहे.

दुसरे उदाहरण आहे अणुऊर्जेचे. अणूत अमाप ऊर्जा साठलेली असते. दगडी कोळशातही ऊर्जा असते. मात्र, अणूतील ऊर्जेची घनता, दगडी कोळशातील ऊर्जाघनतेच्या, हजारो अब्जपट असते. साखळी विदलन प्रक्रियेने तिचे विमोचन करता येते. साखळी प्रक्रियेत निर्माण होणारे विरक्तक (न्यूट्रॉन) खूप वेगवान असतात. ते मंद झाल्याशिवाय विदलन प्रक्रिया घडून येत नाही. त्या विरक्तकांना मंदावण्यासाठी विमंदक (मॉडरेटर) नावाच्या पदार्थाची आवश्यकता असते. सामान्यतः जड पाण्याला विमंदक म्हणून वापरले जाते. त्यातून पार होत असता विरक्तकांची गती मंदावते आणि विदलने घडून येऊ शकतात. अशा रीतीने साखळी प्रक्रिया निरंतर राखून त्याद्वारे मिळणाऱ्या ऊर्जेतून विजेची निर्मिती केली जाते.

आपण विश्रांती घेत असतो त्या कालावधीत कामे होत नाहीत. घडामोडी घडत नाहीत. सजीवास पुनर्भरणाचा तो काळ असतो. विश्वातील आनंदाचा

उपभोग घेण्याची त्याची क्षमता, त्या काळात पुन्हा नवी होत असते. त्याला मग विश्रांत अवस्थेचीच गोडी लागते. कर्तव्य नकोसे वाटू लागते. प्रत्यक्ष आनंदाच्या उपभोगापेक्षाही, उपभोगाचे सामर्थ्य वाढणे महत्त्वाचे वाटू लागते. ह्याकरताच, लक्ष्मी प्राप्त होण्याची इच्छा करणाऱ्याने सहा दोषांपासून दूरच राहावे असा उपदेश, हितोपदेशातील मित्रलाभ प्रकरणात केलेला आहे.

षड्दोषाः पुरुषेणेह हातव्या भूतिमिच्छता ।
निद्रा तन्द्रा भयं क्रोधः आलस्यं दीर्घसूत्रता ।। – हितोपदेश, मित्रलाभ

ते सहा दोष म्हणजे झोप, तंद्री लागणे, भीती, राग, आळस आणि वर्तनमंदता! एकूणात काय तर वर्तनमंदता कदाचित उपभोगाचे सामर्थ्य वाढवून देत असेलही, मात्र ती उपभोगाची साधने प्राप्त करण्यात फारच अडचणीची ठरते. सकाळी फटफटण्यापूर्वीच उठून, भरभर आन्हिके उरकून कामाला लागणाऱ्यासच लक्ष्मी प्राप्त होण्याची संधी उपलब्ध राहते. आपल्या दैनंदिन जीवनातच अशाप्रकारे त्वरेचे महत्त्व ठसवले गेले आहे.

त्वरेला केवळ आपल्याच संस्कृतीत फार महत्त्व दिलेले आहे असे नाही. पाश्चात्यांतही त्वरेचे महत्त्व, हा व्यवस्थापन शास्त्राचा अंगभूत हिस्सा झालेला आहे. चीपर बाय द डझन नावाचे एक अत्यंत सुंदर, वाक्या-वाक्याला हसायला लावणारे एक छोटेसे पुस्तक आहे. त्याचा मराठी अनुवादही सहज उपलब्ध आहे. बारा मुले असलेल्या एका अमेरिकन उद्योजकाची त्याच्याच दोन मुलांनी लिहिलेली ती जीवनकथा आहे. नमुनेदार आहे. काळ-काम-वेगाची गणिते सोडवून उद्योजकता वाढविणारा त्यांचा अभ्यास असतो. झपाट्याने कामे उरकण्याचे महत्त्व त्यांनी हसतखेळत मुलांना कसे शिकवले, त्याची कथा मुळातच वाचनीय आहे. त्या पुस्तकावर अमेरिकेत एक सिनेमाही निघाला होता. खूप गाजलाही होता तो. माँटक्लेअर मधले त्यांचे घर ही व्यवस्थापन शास्त्राची एक शाळाच होती. तिथे अनावश्यक हालचाली टाळून प्रत्येक काम झटपट कसे करता येईल ह्याचा अभ्यास होत असे. आपल्या प्रत्येक दैनंदिन कामातला वेळ कसा वाचवता येईल आणि कौशल्य कसे वाढवता येईल ह्याचा अभ्यास करून ते मुलांकडून कामे करवून घेत असत. त्याच्या चित्रफिती काढत असत. असंख्य अमेरिकन घरांतून त्या चित्रफिती पाहिल्याही जात असत. जाहिरात क्षेत्रातही त्या चित्रफिती लोकप्रिय झाल्या होत्या.

हल्ली व्यायामाचा मूलमंत्रही सारखे हलत राहा हाच असतो. धावता येणे शक्य असेल तर चालू नका, चालणे शक्य असेल तर बसून राहू नका. बसणे शक्य असेल तर आडवे पडून राहू नका. आडवे पडून राहणे शक्य असेल तर किमान निजू नका! अशा धर्तीवर हालचाली करत राहण्याचे समर्थन केले जाते. मधुमेह हा तर रोगच आळशांना हमखास होणारा रोग आहे. तो झाल्यावरही जे किमान कार्यरत राहतात ते त्यासवेळी सुखाने जीवन कंठत आहेत. मात्र सतत हलते राहून मधुमेहास दूर ठेवणारे लोक, नेहमीच निरोगी, निकोप, निरागस राहतात.

तेव्हा मंडळी, त्वरा करा, त्वरा करा, सत्त्वर जागा आणि मांद्य हरा.

**संदर्भः**

१. चीपर बाय द डझन, मूळ लेखकः फ्रँक बंकर गिलब्रेथ (ज्यु.) आणि अर्नेस्टाईन गिल्ब्रेथ कॅरे, मराठी अनुवादः मंगला निगुडकर, मेहता प्रकाशन, अकरावी आवृत्ती, सप्टें-२०१३, किंमत रु.१४०/- फक्त, पृष्ठसंख्या १४७.

**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

# नर्मदा परिक्रमा

**भाग : ३२**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**गुरुवार १४ फेब्रुवारी २०१३ दिवस ८१ वा. कुसली-चरगवा गोरा घाट - सांसीघाट - बिल पठार १५ कि. मी.**

स्नान, मैय्या पूजन करून निघालो. दीड तासाने मैय्याकिनारी चरहगवा गाठला (निमखेडा) पायवाट इतकी कडेला की लोकल ट्रेनमधील तीन सीटवर चौथा माणूस न पडता जेमतेम का होईना बसू शकतो; पण त्याच सीटवर पाचवा माणूस जबरदस्ती बसविला तर त्याला जितकी जागा मिळेल तेवढीच जागा म्हणजे ही अत्यंत धोकादायक पायवाट. एकतर पावसाळी हवेमुळे हवेत अत्यंत उष्मा, जीव नकोसा करणारा. सूर्यकिरण तापदायक वाटतात. चालण्याची इच्छा नाहीशी होते. त्यातून प्राणघातक पायवाट की ओल्यामुळे किंवा अतिशय रेतीमय मातीमुळे पाय पटकन् घसरून पडण्याच्या जागा ठायी ठायी. यामुळे ही पायवाट संपून कधी एकदा एकादा घाट लागतोय आणि गावामध्ये शिरतोय असे झाले होते.

अखेर बारा वाजण्याच्या सुमारास निमखेडा गावात शिरलो. नंतर डांबरी रस्त्याने मुख्य रस्त्याला लागलो. नाक्यावरच बडे हनुमान मंदिर होते. निमखेड्यापासून अंदाजे ९।। कि.मी.वर हा रस्ता भेडाघाट जबलपूरला जाणारा महामार्ग आहे. पावसाची लक्षणे वाटली म्हणून एका ठिकाणी थांबून चहा घेऊन पुढे बिलपठार फाट्यावर आलो. थोडे खाऊन रेल्वे फाटक ओलांडून उजवीकडे वळलो. पुन्हा पाऊस शिंतडायला लागला, थोडे थांबून साडेतीन वाजता बिलपठार आश्रमात थांबलो (पोहोचलो).

संध्याकाळी बन्सीने खिचडी केली. तेल खूप घातल्याने भट्टी बिघडली. झाकण न ठेवल्याने कचवट राहिली. परंतु दिवसभरात भोजन न झाल्याने हा प्रसाद उत्तमच वाटला. एक मोठा बटाटाही भाजून खाल्ला.

टेकडीवर, मैय्याकिनारी एकांतात आश्रम आहे. प्रांगण मोठे, इतरही मोकळी जागा भरपूर आहे. झोपण्यासाठी ओसरीवर आसने लावायला लागली कारण आतली जागा परिक्रमावासीयांनी आधीच व्यापली होती. एका महिलेचे परिक्रमेचे हे चौथे वर्ष सुरू होते. म्हणजे ती इतकी वर्षे घरापासून दूर आहे.

आभाळ दाट भरले होते आणि रात्रभर पाऊस पडला. बन्सीला थंडीमुळे झोप लागली नाही. पण माझी Sleeping Bag उत्तम असल्याने मी मात्र मजेत झोपलो होतो. (मैय्या जवळ असल्यावर तिकडून खूप गार वारा येतो.)

रात्री टेकडीवरून रेल्वे गाडीही पाहिली. हमरस्ता व रेल्वे रूळ या दोन्हीपासून बिलपठार आश्रम जवळ आहे.

**शुक्रवार १५ फेब्रुवारी २०१३ दिवस ८२ वा. बिलपठार - हिराबांध (हिरापूरबांधा) १५ कि.मी.- शिवमंदिर**

पहाटे अंधारातच प्रातर्विधी व स्नान उरकले. तरीही निघायला ८ वाजून गेले. रेल्वे क्रॉसिंगवर येऊन कालच्याच टपरीवर न्याहारी केली. महेशगिरी गोस्वामी हे परिक्रमावासी एकटे असल्याने आज आमच्या बरोबर आहेत. लहानपणापासून पारमार्थिक वाचनाची आवड, पण शिक्षण अजिबात नाही. तरी देवीच्या कृपेने सगळे वाचू शकतात. वय ६६.

जबलपूर सडकेने सुखकर प्रवास सुरू झाला. टोल प्लाझा येईपर्यंत रस्ता छान होता. पण नंतर इतका वाईट की परिक्रमावासीच त्यावरून चालू शकतील! म्हणजे परिक्रमावासींसाठी स्वतंत्र मार्ग बांधण्याची गरज नाही. आहेत ते रस्ते दुरुस्तच करायचे नाहीत! तरीही मैय्याकिनारच्या पायवाटांपेक्षा चांगले ठरतील!

पावसाळी हवा होतीच परंतु ऊन नव्हते. म्हणून फार वेळा सॅक खाली उतरावी लागली नाही.

---

प्रत्येक पतंगीला माहित असते की शेवटी कचऱ्यात जायचंय, पण त्याच्याअगोदर आकाश गाठायचंय.
जीवन सुद्धा हेच मागत असतं.

दोन-तीन वेळा अयाचित चहा, एकदा चहा-न्याहारी मिळाली. पावसाचे थेंब सुरू झाले आणि थांबलो पण पाऊस लागला नाही. चार वाजल्यानंतर धरमपुरी गाव लागले. सोय होईल कळल्याने मंदिरात गेलो. अखंड रामायण कुणीतरी वाचत होते. ध्वनिक्षेपक होता पण एकही श्रोता नव्हता. तयार भोजन मिळणार नव्हते. करावे तर गोवऱ्या, लाकडे मिळणार नव्हती, साधुबाबा थोडे रागात होते, म्हणाले, 'जायचे तर जा पण पुढे काही व्यवस्था नाही. भोजन मैय्या देईल!' परंतु मैय्या कुणाद्वारा भोजन देईल याचा उलगडा नव्हता! आम्ही क्षमा मागून पुढे निघालो कारण मैय्या देईल तर पुढल्या गावातसुद्धा मिळेल!

पंधरा-वीस मिनिटात पुढील (हिरापूरबांधा) गाव दिसू लागले. एक वृद्ध गृहस्थ भेटले. व्यवस्था भोजनासह विचारली तर गावासमोरील आश्रमात जाण्याचा सल्ला मिळाला.

आश्रम दिसला नाही परंतु गावातील मंदिराचा भव्य घुमट दिसला आणि नक्की केले की गावातील त्याच मंदिरात मुक्काम करायचा.

मंदिर गाठले. उतरायला हरकत नाही कळले. परंतु पाहिले तर कुलूप. एकजण किल्लीसाठी गेला. (बरोबर गोस्वामीजी गेले) किल्ली मिळाली नाही. गोस्वामी परतले. मी व बन्सी पुजाऱ्यांच्या घरी गेलो. पुजारी नव्हते, मैय्याजी या पलीकडे काही बोलायला तयार नव्हत्या.

म्हटले, 'मंदिरात नाही तर ठीक; पण पावसाळी वातावरणामुळे वर छप्पर आवश्यक आहे. तुमच्या ओसरीवर जागा दिलीत तरी चालेल आणि मंदिरात उतरण्याचा परिक्रमावासींना हक्क आहे. आपण किल्ली देत नाही काय? आम्ही तुम्हाला चोर लुटारू डाकू वाटतो का? एक रात्र राहून पुढे जातो आणि आज ८२ वा दिवस आहे हा क्रम सुरू आहे.'

माउलीने किल्ली काढून दिली. भोजनाचा विषय काढला तर प्रतिसाद नाही. त्यांच्या घरातून बाहेर उभा असलेला म्हणाला, 'चालत असेल तर धाब्याचे भोजन देतो.'

पैसे दाखवून मी सांगितले की, 'पैसे माझ्याकडेही आहेत. मी जेवण विकत घेऊ शकतो. त्यासाठी तुम्ही पैसे का खर्च करावेत' त्यावर तो म्हणाला की, 'तो या गावचा नाही, इथे पाहुणा आहे.'

पाच घरी भिक्षा मागण्याचा प्रघात आहे. आम्ही दुसऱ्या घरात विचारतो म्हणून पुढे होऊन अंगणातून 'नर्मदे हर'चा पुकारा केला तर एक महिला पुढे आली. 'परिक्रमावासी आहोत, पैदल आहोत, ३ मूर्तींसाठी भोजन मिळेल का?' असे विचारले. तत्पूर्वी, घरात कुणी नाही असे ती म्हणत होती. तिला म्हटले, तुम्ही तर आहात ना? मला तुमच्याशीच बोलायचे आहे.

इतक्यात एका व्यक्तीने टमाटे, वांगी इ. भाजी व पीठ यांच्या पिशव्या सोपविल्या. त्याच आम्ही त्या स्त्रीकडे सोपविल्या तर ती ते घ्यायला तयार होईना. म्हटले हे ओझे आम्ही वागविणार नाही. अखेर प्रसाद-रूप म्हणून हे वापरा असे सांगून आम्ही परतलो.

मंदिर अगदी प्रशस्त. दोन मोठी शिवलिंगे असलेले. पुजारीबाबा येण्याअगोदर कुणी मुलाने चहा आणून दिला होता. मंदिर गावाच्या एका टोकाला आहे. समोर मुले खेळत होती. पुजारीबाबा मंदिरात आले. पाहिले तर मघाशी भेटलेले हेच ते वृद्ध गृहस्थ (श्री. दुबे).

साडे-सात वाजता पुरी-भाजीचे भोजन घेऊन विवेक पाण्डे (म्हणजे भोजन सांगितले त्या घरातील मुलगा) आले.

पुरी-भाजी बरोबर थर्माकोलच्या ३ थाळ्या, पाणी पिण्यासाठी प्लास्टिक ग्लास सर्व व्यवस्था झाली.

जेवणापूर्वी छान गप्पा झाल्या. परिक्रमावासी किंवा बाहेरील तथाकथित साधूंच्या संशयास्पद / आक्षेपार्ह वर्तनामुळे हे अविश्वासाचे वातावरण!

रात्री जोरात पावसाच्या सरी आल्या. वातावरण ओलसर गारेगार होऊन गेले. थंड वारे सुटले.

**- अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

---

विजेते वेगळ्या गोष्टी करत नाहीत. ते प्रत्येक गोष्ट वेगळेपणाने करतात.

# वस्तू व सेवा कर (GST)

*'वस्तू व सेवा कर' या संबंधीची माहिती या लेखात दिली आहे - संपादक*

बऱ्याच काळापासून रेंगाळलेलं GSTचं घोडं, यावर्षी गंगेत न्हालं असं म्हणायला हरकत नाही.

साधारणतः कोणत्याही देशाची करप्रणाली प्रामुख्याने 'प्रत्यक्ष कर' (Direct Taxes) व अप्रत्यक्षकर (Indirect Taxes) या दोन करांमध्ये विभागलेली असते. यातील अप्रत्यक्ष कर हा नेहमी शेवटच्या वापरकर्त्याकडून वसूल होतो. म्हणजेच सामान्यतः जनतेकडून वसूल होतो. सरकारसाठी उत्पन्न मिळवण्याचा हा सरळ व थोड्या प्रमाणात सोपा उपाय आहे.

आपल्या देशात केंद्राकडून व राज्यांकडून हे अप्रत्यक्ष कर आकारले जातात. ज्यात वस्तूंवरचा व सेवासंबंधी साधारण १०-११ वेगवेगळे कर आहेत. GSTच्या रुपाने प्रथमच या सर्व करांऐवजी एकच कर ही ढोबळ कल्पना आहे. खालील विभागणी वरून त्याची थोडी कल्पना येईल.

**केंद्र आकारणी कर**

१) केंद्र उत्पादन शुल्क

२) उत्पादन शुल्क (औषध प्रसाधन)

३) उत्पादन शुल्क (विशेष वस्तू)

४) उत्पादन शुल्क (वस्त्रोद्योग)

५) अतिरीक्त सीमा शुल्क

६) विशेष अतिरीक्त सीमा शुल्क

७) सेवा कर

८) केंद्रीय अधिभार व उपकर

**राज्य आकारणी कर**

१) राज्य मूल्यवर्धीत कर (VAT)

२) केंद्रीय विक्रीकर (CST)

३) ऐषआराम कर

४) प्रवेशकर (Octroi)

५) करमणूक कर

६) जाहिरातीवरील कर

७) खरेदीकर

८) लॉटरी, बेटींग कर

९) राज्य अधिभार व उपकर

वर नमूद केलेले बहुतांश कर हे येणाऱ्या वस्तू व सेवा करांमध्ये (GST) अंतर्भूत होणार आहेत. एक देश-एक कर (one nation one tax) या संकल्पनेकडे टाकलेले महत्त्वपूर्ण व सकारात्मक पाऊल म्हणून याकडे पाहणे गरजेचे आहे.

आणि आपल्या सर्वांच्या माहितीसाठी तसेच अभ्यासासाठी GST भारतात लागू होण्यासाठी घटना व कायदा यांची काय भूमिका आहे हे कळणे महत्त्वाचे आहे.

या सर्व आणि इतर विषयांसाठी घटना दुरुस्ती विधेयक (घटना (एकशे बाविसावी) दुरुस्ती बिल्ड, २०१४) लोकसभेमध्ये डिसेंबर २०१४ रोजी मांडण्यात आले आणि हे विधेयक लोकसभेमध्ये मे, २०१५ ला मंजूर करण्यात आले. हे विधेयक नुकतेच राज्यसभेतही मंजूर झाले आहे. यातील ठळक वैशिष्ट्ये अशी आहेत-

१) मानवाने सेवन करावयाच्या मद्यपी दारू व्यतिरीक्त

सर्व वस्तू व सेवांवर GST आकारण्यात येईल.

२) केंद्र व राज्यांकडून वेगवेगळा दुहेरी वस्तू व सेवा कर आकारला जाईल.

३) केंद्राने आकारावयाच्या वस्तू व सेवा कराच्या बाबतचे कायदे करण्याचे अधिकार संसदेस असतील. तर राज्यांनी आकारावयाच्या वस्तू व सेवा कराच्या बाबतचे कायदे करण्याचे अधिकार राज्य विधान मंडळास असतील.

४) जेथे वस्तू व सेवा यांचा पुरवठा आंतरराज्य व्यापारात येतो (GST) तेव्हा वस्तू व सेवा कराच्या बाबतीत कायदे करण्याचे विशेष अधिकार संसदेस असतील.

५) GST व्यतिरीक्त करमणूक व मनोरंजन कर वेगळा आकारण्याचा अधिकार राज्याच्या स्थानिक संस्थांना असेल.

६) सुधारणा विधेयकाच्या तरतुदी नुसार वस्तू व सेवा कर परिषदेचा प्रत्येक निर्णय तीन चर्तुथांश बहुमताने उपस्थित सदस्यांनी केलेल्या मतदानाने घेतला जाईल. वस्तू व सेवा कराच्या परिषदेच्या बैठकीच्या वेळी सदस्यांची गणसंख्या एकूण सदस्यांपैकी अर्धी तरी असली पाहिजे.

या सर्व गोष्टींची पूर्तता होऊन, GST अंमलात येण्यास बराच वेळ लागणार आहे. यातील फायदे, तोटे जोपर्यंत हा कायदा प्रत्यक्षात येत नाही तोवर कळणे कठीण आहे. परंतु याचे बरे वा वाईट परिणाम मात्र आपण नक्कीच विचार करू शकतो.

सध्या अस्तित्वात असलेल्या सगळ्या अप्रत्यक्ष कर सेवेमध्ये देशभरात शासकीय, निमशासकीय नोकरदार कार्यरत आहेत. या सर्व नोकरदारांचे भवितव्य काय? हा मोठा प्रश्न आहे. सकारात्मकदृष्ट्या या वर्गाची नोकर कपात म्हणजे सरकारी वेतन तिजोरीवरील हलका होणारा भार अशा दृष्टीने आपण पाहू शकतो.

GST करप्रणालीमुळे व त्याच्या इलेक्ट्रॉनिक अंमलबजावणीमुळे भ्रष्टाचार कमी होणे व महसुल वाढणे ही दोन अत्यंत महत्त्वाची वाजणारी नाणी सरकारच्या हातात आहेत. तेव्हा 'अच्छे दिन' येणार का? हेही याद्वारे कळून येईल.

GST चा सामान्य करदात्याला होणारा फायदा हा टप्प्याटप्प्याने होणारा असून, GST आले म्हणजे पैसे वाचले असं समजणं भोळेपणाचं आहे. सुरूवातीचा काही काळ म्हणूनच महागाई दर चढा राहाणाराच असणार आहे. थोडक्यात 'कुछ पाने के लीये कुछ खोना पडता है' या उक्तीनुसार आपण या प्रारंभिक काळासाठी तयार राहायला हवं. अर्थात अजूनही GST च्या दरावर (Rate of Tax) एकमत नाही. हा दर १८% ते २४% पर्यंत असू शकतो. आपल्या अर्थमंत्र्यांनी २६% हा दर जाता जाता सुचविला आहे. अर्थात हा दर चढा राहिल्यास जनता म्हणून चांगल्या विकासाची अपेक्षा बाळगणं अगदीच योग्य आहे.

वस्तू व सेवा कराच्या अंमलबजावणीचे लक्ष्य १ एप्रिल २०१७ आहे. महत्त्वाच्या कर सुधारणांची अंमलबजावणी कर आधार विस्तारणे, कर अनुपालन वाढविणे आणि आंतरराज्य कराच्या तफावतीमुळे होणारे आर्थिक विपर्यास कमी करण्यासाठी GST उपयुक्त ठरावा. या सोप्या करप्रणालीमुळे आर्थिक क्रियशीलता वाढण्यास मदत होईल. ज्याचा लाभ सर्व वर्गांना होईल. यामुळे कर प्रशासन स्थिर होईल. व्यवसायात पारदर्शकता वाढेल. ज्यामुळे केंद्र व राज्यांचे महसुल वृद्धींगत होतील. उद्योगांचा पालन खर्च कमी होईल. आपण आशा करू या, करदाता, शासन व ग्राहक या सर्वांचे हीत जपणारा कायदा, आपल्याला उज्ज्वल भारताकडे घेऊन जाणारा असेल.

**– प्रशांत शिंदे**
3rd Year LLB

# ऑक्सफर्ड, केंब्रीज, लंडन शैक्षणिक सहल

*विद्या प्रसारक मंडळाने आयोजित केलेल्या शैक्षणिक सहलीत लंडन आणि केंब्रीज या शहरातील काही ठिकाणांना भेट देऊन झाल्यावर लिहिलेल्या रोजनिशीचे हे एक बोलके पान आहे - संपादक*

ऑक्सफर्ड कालच पाहून झाले होते. आज सकाळी उठून लंडनला जायचंय. ऑक्सफर्डबद्दल एक सांगायचे राहून गेले. ऑक्सफर्ड आपल्याच गतीत जगणारं शहर वाटलं. अतिशय शांत, कोणतीही घाई नाही, गडबड गोंधळ तर अजिबातच नाही. लंडन मात्र वेगळे आहे.

आज डबलडेकरमध्ये वरच्या मजल्यावर बसल्यामुळं आजूबाजूचा परिसर नजरेत साठवता येत होता. लंडनला पोहोचल्यावर पहिल्यांदाच जाणवला तो तापमानातला फरक. ऑक्सफर्ड खऱ्या अर्थानं खूपच थंड, लंडन त्यामानानं थोडं गरम वाटलं. शहरीकरणामुळं असेल कदाचित.

पहिल्यांदाच लंडनची ट्यूब रेल अनुभवली. फक्त पिक्चरमध्येच पाहिलेली होती. ट्यूबरेल म्हणजे फक्त रेल्वे जाण्यापुरता केलेला बोगदा. रेल्वे चालतांना अक्षरशः काही इंचच दोन्ही बाजूंनी जागा असते. फक्त प्लॅटफॉर्म वर लोकांना थांबण्यासाठी जागा असते. ट्यूबचे वैशिष्ट्य म्हणजे या एकाच दिशेने जाणाऱ्या आहेत. आपल्याकडल्या लोकलसारखे रूट-मॅप पण प्रत्येक डब्यात आहेत, अन् उद्घोषणा पण आपल्या सारख्याच. आता स्टेशनच्या बाहेर आपण मॅप लावतोच. त्यामुळे तुम्हाला कुठं जायचंय ते पटकन समजतं. आम्ही आइस्टर (Oyster) पास विकत घेतला. हा पास असा आहे की तो तुम्हाला Train, Bus मध्ये कुठेही वापरता येतो.

ब्रिटिश सभ्यता म्हणजे काय याचा अनुभव पदोपदी येतोच. सरकते जिने आपल्याकडे आहेत त्यापेक्षा ३/४ पट मोठे असावेत. पण त्या जिन्यावर उभे राहणारे लोक उजव्या म्हणजे उजव्याच बाजूला झुकून उभे राहतात. डाव्या बाजूला उभा राहणारा बाहेरचा समजावा. डाव्या बाजूला ज्यांना चालत जायचं असेल ते चालत जातात.

YMCA मध्ये आमचं वास्तव्य सात दिवसांचं आहे. स्थीरस्थावर झाल्यानंतरच आम्ही बाहेर पडलो. आजची पाहण्याची दोन ठिकाणं म्हणजे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांचे अन् लोकमान्य टिळकांचे घर.

गोऱ्या साहेबांचे एक वैशिष्ट्य म्हणजे ते आपल्या शत्रुचीही गुणग्राहकता टिपतात. ज्या स्वातंत्र्यवीर सावरकरांनी इंग्रजांविरुद्ध सशस्त्र लढे दिले, त्यांच्या घरावरची पाटी आहे - V.D. Savarkar, Indian Patriot and Philosopher lived here. सावरकर इथं राहिले ते १९०६-१९०९ या काळात. सावरकर कायद्याचा अभ्यास करत होते. त्याचबरोबर इंग्रजांविरुद्धची लढाई पण चालू होती. सावरकरांनी आपला अभ्यासक्रम पूर्ण केला. पण इंग्रजांनी त्यांना पदवी देणं नाकारलं. कारण त्यांनी इंग्रजांविरुद्ध उभारलेला लढा. सावरकरांनी याविरुद्धही आवाज उठवला.

टिळकांच्या घरी जाताना वाटेतच एक लहानसा कालवा लागला. लोक बोटिंगचा आनंद घेत होते. टिळक इथं रूढ अर्थानं शिक्षणासाठी आले नव्हते. त्यांच्यावर भरण्यात आलेल्या खटल्याच्या सुनावणीसाठी ते इथे आले होते. त्यानिमित्तानं त्यांचं वास्तव्य याठिकाणी होतं. त्या घरावर पाटी लावलेली आहे.

**वातावरणातला मोकळेपणा**

पुढचा दिवस केंब्रीजचा. सकाळी तयार होऊन

केंब्रीजला जाण्यासाठी १० नं ची बस घेतली व किंग्ज क्रॉस स्टेशनला उतरलो. हे स्टेशन पाहून आठवलं ते आपलं शिवाजी छत्रपती टर्मिनस. इतकी मिळती जुळती डिझायन्स आहेत. वाटेत जातांना ब्रिटिश लायब्ररी लागली. बाहेरगावी जाणाऱ्या गाड्या इथून सुटतात. आमची केंब्रीजची गाडी ७ नं. प्लॅटफॉर्मवरून सुटली. लंडन ते केंब्रीज हा प्रवास ५० मिनिटांचा, तोही असाच नेत्रसुखद.

केंब्रीजला उतरल्यानंतर आम्ही 'हॉप ऑफ हॉप ऑन' (Hop off Hop on) म्हणजे 'उतरा चढा बसा' अशा बसमध्ये बसलो. अशा बसमध्ये बसल्यावर तुम्ही एक इअरफोन घ्यायचा. तो प्लॅग करायचा. तुम्ही ज्या ठिकाणी आहात तिथली माहिती तुम्हाला सांगण्यात येते.

केंब्रीजचं वैशिष्ट्य म्हणजे इथं विज्ञानाचं शिक्षण मोठ्या प्रमाणावर दिले जातं. सुरवातीला विद्यापीठीय शिक्षण ऑक्सफर्डनं दिलं. त्यांनी काय शिक्षणाचा मक्ता घेतलाय काय? अशी भावना जागृत झाली अन् आपण एक नवं शिक्षण केंद्र सुरू करू अशी कल्पना त्यांना सुचली. त्याला कारणीभूत एक तत्कालीन घटनाही घडली.

ऑक्सफर्डमध्ये धनुर्विद्या (Archary) चा अभ्यास करताना काही विद्यार्थी दगावले. त्यातून काही विद्यार्थी व प्राध्यापक केंब्रीजला पळून आले. येथे त्यांनी कॉलेज सुरू केले.

चार्ल्स डार्विन ज्यानं उत्क्रांतीवादाचा सिद्धांत मांडला अन् जग बदललं, त्याच्या नावाने इथं कॉलेज आहे. डार्विन कुटुंबीय इथं राहत होते आणि त्यांनी कॉलेजला आपली जागा दिली. डार्विनच्या उत्कांतीवादाच्या सिद्धांता अगोदर डार्विनला भूगर्भशास्त्रात रस होता अन् तो वेगवेगळे दगड जमा करायचा. त्याच्या वडिलांना त्याने डॉक्टर व्हावं असं वाटायचं. त्यामुळे त्यानं वैद्यकीला प्रवेशही घेतला. पण आवडच नसल्यामुळं त्यानं तो सोडला. वयाच्या केवळ २८ व्या वर्षी तो तब्बल पाच वर्ष सफारीवर निघाला. ज्या बोटीनं त्याने प्रवास केला त्या बोटीची, प्रतिकृती येथे आहे. डार्विन कॉलेजमध्ये पहिल्यांदा महिलांना प्रवेश देण्यात आला. नाकाने कांदे सोलणाऱ्यांच्या देशात स्त्रिया मात्र कधीपर्यंत दुय्यम स्थानावर होत्या त्याचा अंदाज येण्यासाठी हे पुरेसे आहे. चार्ल्स डॉर्विनच्या भूगर्भशास्त्रातला संग्रह शॅडविक संग्रहालयात ठेवण्यात आला आहे.

ज्यावेळी चार्ल्स उत्क्रांतीवादावर काम करत होता त्याचवेळी जगातल्या दुसऱ्या भागातही त्याच पद्धतीचं काम चालू होतं अन् त्या शास्त्रज्ञाने चार्ल्सला ते कळवलं. चार्ल्स आश्चर्यचकित झाला. इतकं साधर्म्य दोघांच्या कामात कसं असू शकतं. ते त्यानं आपल्या मार्गदर्शकांना सांगितलं. त्याच्या गुरुजींनी त्याला सांगितलं की, तू हे तुझं संशोधन तात्काळ प्रकाशित कर. अन् जगाला डार्विनने उत्क्रांतीवादाचा सिद्धांत दिला. आज जगातल्या कोणत्याही सजीवाची वर्गवारी चार्ल्स डार्विनने आखून दिलेल्या पद्धतीनुसार केली जाते. विसाव्या शतकावर प्रभाव पाडणाऱ्या दोन महान माणसांत एक अल्बर्ट आइनस्टाइन तर दुसरा चार्ल्स डार्विन.

दुसरं महत्त्वाचं कॉलेज म्हणजे चर्चिल कॉलेज. इंग्लडचा तत्कालीन पंतप्रधान अमेरिकेच्या MIT ला भेट द्यायला गेला अन् प्रभावित झाला. अशाच पद्धतीचं कॉलेज आपल्याकडही सुरू झालं पाहिजे या भावनेतून त्यानं हे कॉलेज सुरू केले. इथं ७०% शिक्षण हे भौतिक, रसायन आणि गणित या विषयावरच होतं.

टेफलॉनचं छत असलेली एक इमारत जाताना पाहिली. असं सांगण्यास आलं की, तिथं oil & gasच्या शोध विषयक काम चालतं आणि काही वाईट घटना (विस्फोट) वगैरे घडली तर कमीत कमी हानी पोहोचावी असा उद्देश आहे. त्यासाठी हे छत टेफलॉनचे केलेले आहे.

बिल्स गेट्सच्या मायक्रोसॉफ्टचे कार्यालयही इथं आहे. आजचं सर्वात आकर्षणाचं स्थळ होतं केंब्रीज, अमेरिकन दफनभूमी आणि मेमोरिअल. दुसरं महायुद्ध १९३९ ला सुरू झालं आणि इंग्लड व त्याची मित्रराष्ट्र हिटलर विरुद्ध करारीनं झुंजत होती, पण त्यांची झुंज अपयशी ठरत होती. अमेरिका द्वितीय महायुद्धात जपाननं पर्ल हार्बरवर हल्ला चढवेपर्यंत कुठंच नव्हती. पण जेव्हा जपानने पर्ल हार्बरवर हल्ला चढवला तेंव्हा अमेरिका मग मित्र राष्ट्रांच्या मदतीला आली. १९४२ च्या सुमारास अमेरिका उघडपणे युद्धात उतरली. इंग्लंड आणि युरोपच्या भूमीवर अमेरिकन सैनिक उतरले. त्यापैकी ३५०० च्या जवळपास युद्धात कामी आले तर ५५०० चा काही शोध लागू शकला नाही अशा वीर सैनिकांच्या स्मृत्यर्थ हे मेमोरिअल बांधण्यात आले आहे.

डॉ. बेडेकरांनी बोलताना सांगितलं की, अमेरिकेतील सैनिकांना सन्मानाने दफन करण्यात यावं अशी इंग्लडकडे अमेरिकेने इच्छा प्रदर्शित केली आणि ही जमीन अमेरिकेला देण्यात आली. आता ही भूमी अमेरिकेच्या ताब्यात आहे. आपल्या सैनिकांविषयी किती उच्च कोटीचा आदर आहे हा! आपल्या मायभूमीसाठी बलिदान देणाऱ्यांचं यथोचित स्मारक व्हावं आणि पुढच्या पिढ्यांनींही त्यापासून प्रेरणा घ्यावी हाच उद्देश.

मोमोरिअलच्या सुरवातीलाच दिर्घीकेत एक छोटीसी फिल्म दाखविण्यात येते; ज्यात अमेरिकन सैनिकांच्या युद्धातल्या कामगिरीविषयक माहिती आहे. शहीद झालेल्या प्रत्येक सैनिकाचं नाव आणि क्रॉस (शुभ्र) इथं उभारला आहे. इथं युद्धात हरवलेल्या प्रत्येक सैनिकाचे नाव Missing Wall नावाच्या भिंतीवर लिहिलं आहे. त्यात लिहिलंय की, 'जे वीर मरण पावले त्यांनी मानवता जिवंत राहावी यासाठी आपले प्राण अर्पिले. त्यांची स्मृती चिरंतन राहो.' डॉ. बेडेकर म्हणाले त्याप्रमाणे 'ज्यांना आपल्या देशातल्या सैनिकांप्रति आदर, तो देश महान असतो.'

सहजच विचार आला. आपल्या भारतात किती लढाया लढल्या गेल्या त्या वीरांच्याप्रति कुठं नाही चिरा, नाही पणती अशी अवस्था आहे.

अमेरिकेच्या उण्यापुऱ्या फक्त ८००० सैनिकांसाठी इंग्लंडमध्ये ३० एकर परिसरात त्यांची स्मृती जपली आहे. पण आपल्या पानिपत १,२,३ मध्ये लाखो सैनिक मारले गेले. पण त्याचा आपल्याला पत्ताच नाही. शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांनीही किती लढाया पाहिल्या. पण त्यांची अवस्था पाहिली की मन उदास होऊन जातं.

केंब्रीजहून परतल्यावर डॉ. मॅझिनीचं घर दुरूनच दाखवलं. मॅझिनीच्या कार्यातून अनेक भारतीय स्वातंत्र्य सैनिकांना प्रेरणा मिळाली. मदनलाल धिंग्रानं सर कर्झन वायलीचा खून केला. त्याला नंतर फाशी देण्यात आली. पण आपल्याला या वीराची जन्मतारीखच माहीत नव्हती. ब्रिटिश कागदपत्रांवरून आपल्याला ती शोधावी लागली. युनिव्हर्सिटी कॉलेज लंडनने ही कागदपत्रे उपलब्ध करून दिली!

संध्याकाळी डॉक्टरांनी उजळणी घेतली. माझ्या स्मरणात राहिलेली गोष्ट म्हणजे रोज काय काम केलं याचं सविस्तर वर्णन संध्याकाळी आपण लिहिलं तर तुमचा बुध्यांक ३ पटीने वाढू शकतो. २० वर्षांखालील मुलांना हे लागू आहे. त्यानंतर बुद्धीच्या वाढीला क्षमतेला मर्यादा येतात. मोठ्या माणसांसाठी देखील रोजनिशी लिहिणे उपयुक्त ठरते. त्यातून दिवसभराच्या कामाची पुन्हा एकदा उजळणी होते. त्यामुळे त्या घटना आपल्या चांगल्या लक्षात राहतात. (क्रमशः)

**– सुभाष एंगडे**

•••

# शेक्सपिअरच्या मातृभूमीतून

*विद्या प्रसारक मंडळाच्या नुकत्याच पार पडलेल्या लंडन येथील शैक्षणिक सहलीच्या अनुषंगाने ऑक्सफर्ड येथील बॉडलियन लायबरी व लंडनस्थित ब्रिटिश लायब्ररीत शेक्सपिअरच्या ४०० व्या स्मृतीदिनानिमित्त भरवल्या गेलेल्या सुंदर प्रदर्शनांचा हा प्रत्यक्षदर्शी लेखाजोखा – संपादक*

विल्यम शेक्सपिअर हा इंग्रजी साहित्याच्या क्षितीजावरील ध्रुवतारा आहे. चारशे वर्षे लोटली तरी शेक्सपिअरच्या अनेक नाटकांची मोहिनी रसिकमनांवर अजूनही कायम आहे. प्रख्यात इंग्रजी नाटककार व शेक्सपिअरचा समकालीन असलेल्या बेन जॉन्सनने अगदी योग्य निरिक्षण मांडलंय तो म्हणतो –

Shakespeare was not of an age, but for all time!

अगदी योगायोग म्हणजे शेक्सपिअरच्या मृत्यूला २०१६ मध्ये चारशे वर्षे पूर्ण होतात. त्याच्या स्मृतीदिनाची चतुःशताब्दी समग्र विश्वात साजरी होताना विद्या प्रसारक मंडळाची शैक्षणिक सहल १९ मे ते ३० मे २०१६ दरम्यान इंग्लडला जाऊन आली व त्याचा भाग होता येथे आल्याचं मोठं अप्रूप व कौतुक मला वाटतंय. डॉ. विजय बेडेकर व डॉ. आगरकरांसोबत इंग्लडची वारी करता येणं म्हणजे जणू काही एखाद्या नवख्या भाविकाने एखाद्या श्रद्धावान वारकऱ्यासोबत पंढरीची वारी करण्यासारखं आहे. इंग्लंडच्या शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय संचिताची जाण असणाऱ्या व भारतीय शैक्षणिक संस्थांमध्ये खरोखरच मूल्याधारीत शिक्षणप्रणाली रुजवू पाहणाऱ्या डॉ. बेडेकरांची तळमळ या दौऱ्यात प्रत्येक वेळी जाणवली.

आमच्या इंग्लंड दौऱ्याच्या काळात शेक्सपिअरच्या मृत्यूच्या चतुःशताब्दी निमित्त भरवण्यात आलेल्या दोन प्रदर्शनांना जवळून पाहता आलं. पहिलं प्रदर्शन ऑक्सफर्डच्या बॉडलियन लायब्ररीत तर दुसरं लंडनस्थित ब्रिटिश लायब्ररीत होतं. त्या दोनही प्रदर्शनांना जवळून अनुभवून एक साहित्याचा विद्यार्थी म्हणून माझ्या शेक्सपिअरबद्दलच्या ज्ञानात मोलाची भर पडली. इंग्लंडच्या जन्मगावी अर्थात 'स्ट्रॅटफर्ड–अपॉन एव्हन' येथे जाता आले नाही; पण या दोन प्रदर्शनांनी शेक्सपिअर समजून घेण्यास एक नवी दृष्टी दिली. प्रस्तुत लेखात या 'Shakespeare's Dead' व 'Shakespeare in Ten Acts' या दोन अप्रतिम प्रदर्शनांची थोडक्यात माहिती देण्याचा प्रांजळ प्रयत्न केला आहे.

आम्ही ऑक्सफर्डला २० व २१ मे दरम्यान युथ हॉस्टेल असोशिएशनच्या प्रशस्त वसतिगृहात राहिलो. तिथून ऑक्सफर्डचा प्रसिद्ध ब्रॉडस्ट्रीट हाकेच्या अंतरावर आहे. आम्हा २५ जणांच्या चमूला घेऊन डॉ. बेडेकर 'वॉकींग टूर ऑफ ब्रॉडस्ट्रीट' ला निघाले. प्रत्येक इमारतीची व रस्त्यांची माहिती ते देत होते. जेव्हा आम्ही ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या बॉडलियन लायब्ररीत गेलो तेव्हा तेथे शेक्सपिअरच्या मृत्यूच्या चतुःशताब्दीनिमित्त 'Shakespeare's Dead' हे प्रदर्शन भरलं होतं. ऑक्सफर्ड विद्यापीठातील इंग्रजीचे प्राध्यापक सायमन पालफ्रे व एम्मा स्मिथ यांच्या कल्पनेतून साकारलेलं हे अनोखं प्रदर्शन. शेक्सपिअरच्या एकूण ४० नाटकांमध्ये आलेले मृत्यूचे संदर्भ व त्याच्या शोकात्मनाटकांच्या (Tragedies) नायकांना मृत्यूला सामोरे जाताना आलेल्या अनुभवांचा एक धावता माहितीपट म्हणजे हे प्रदर्शन. कोणाचा मृत्यू युद्धात तलवारीने झाला, तर कोणाला विषप्रयोग करून मारलं.

क्लिओपॅट्राने तर स्वतःला सर्पदंश करवून घेतला. मॅकबेथने डकनला छळ व कपटाने मारलं. असे किती तरी संदर्भ इथे उद्‌धृत केले आहेत. बॉडलियन लायब्ररीतील हे प्रदर्शन म्हणजे सादरीकरणाचा उत्कृष्ट नमुना आहे. शेक्सपिअरच्या हस्तलिखितांवर उत्कृष्ट प्रकाश योजना करत मृत्यूचा उल्लेख असलेला नेमका उतारा प्रकाशझोतात आणून अगदी अनोख्या पद्धतीने साकारला आहे. प्रख्यात दिग्दर्शकांनी निर्मिलेल्या शेक्सपिरियन नाटकांच्या व चित्रपटांच्या निवडक ध्वनिचित्रफीती येथे पाहाता आल्या. सायमन पालफ्रे यांच्या ॲनिमेटेड लघुपटांनी तर प्रदर्शनाला एक नवा आयाम दिला आहे. मॅकबेथला चेटकीणींनी 'तू राजा होशील' असं केलेलं भाकित व राजवाड्यात त्याने राजा डकनचा केलेला खून ॲनिमेशन पटात पाहाता येतो. तेथे एक सुंदर फ्लेक्स पाहिला. त्यावर लिहिलं होतं –

"In his history plays, Shakespeare brings back figures from the past in order to kill them a new on stage. History is about the already dead. So to refuse to die in a history play - as Falstaff does - is to challenge the whole invevitable movement of the genre. But history plays also humanize the past and comprehend its struggle on a human scale - battles on stage are not large scale monoeuvres but hand to hand fights between individualised combatants whose deaths matter to us..."




**British Library, London**

दि. २७ मे २०१६ रोजी आम्ही लंडनस्थित जगप्रसिद्ध ब्रिटिश लायब्ररीत गेलो. ब्रिटिश लायब्ररी म्हणजे ब्रिटिशांचा सांस्कृतिक वारसा. 'ट्रेझर्स ऑफ ब्रिटिश लायब्ररी' असं एक स्वतंत्र दालन आहे ज्यात जगप्रसिद्ध ग्रंथांची हस्तलिखितं आहेत. अनेक धार्मिक ग्रंथ व प्रत्येक धर्माच्या मूळ ग्रंथांची हस्तलिखितं आहेत. मी तिथे सोन्याच्या मुलाम्याने लिहिलेली 'ज्ञानेश्वरी' व 'देवीमहात्म्य' हे ग्रंथ पाहिले व थक्क झालो. मुघलांसारखं ग्रंथ जाळण्यापेक्षा त्यांचं जतन व संवर्धन ही इंग्रजांची एक विशेष ओळख. ज्या कविता व लेखकांना इंग्रजी साहित्यात वाचलं होतं त्यांची हस्तलिखितं, त्यांच्या आवाजात सादर केलेल्या कविता व रेकॉर्डिंग तिथं पाहता आल्या. जेन ऑस्टीनची 'पर्सूएशन' या कादंबरीची ऑस्टीनच्या हस्ताक्षरातील प्रत, ब्रॉन्टे भगिनींचं वाङ्मय, एलिझाबेथ बॅरेट ब्राऊनिंगची 'How do I Love thee let me count the ways' या जगप्रसिद्ध कवितेचं तिच्या हस्ताक्षरातलं पान, टी. एस. एलियटच्या हस्ताक्षरातील 'वेस्ट लँड', बेकनचं 'न्यू ॲटलांटिस' थॉमस मोरचा 'यूरोपीया' इत्यादी ग्रंथांची मूळ हस्तलिखितं पाहता आली. टिंडेलचं १५३६ साली सर्वप्रथम इंग्रजीत भाषांतर केलेलं बायबल पाहिलं व थक्क झालो.


अशा अनेक साहित्यरत्नांचं दर्शन करत करत पुढे सरकताना एका दालनात 'Shakespeare in Ten Acts' हे प्रदर्शन पाहिलं. मागच्या चारशे वर्षांत शेक्सपिअर इंग्रजांचा 'सांस्कृतिक चेहरा' कसा बनला याचा अत्यंत तर्कनिष्ठ मागोवा या प्रदर्शनात घेतला आहे. शेक्सपिअरच्या नाटकाच्या असंख्य प्रयोगांतून केवळ १० प्रयोग निवडून शेक्सपिअरच्या कीर्तीत कशी टप्प्याटप्प्याने वाढ होत गेली आणि आज जग ज्या दृष्टीकोनातून शेक्सपिअरकडे पाहातं त्या आकलनाची स्थित्यंतरं मांडण्याचा प्रयत्न या प्रदर्शनात केला आहे. इ.स. १६०० मध्ये लंडनमधील ग्लोब थिएटरमध्ये

झालेल्या हॅम्लेटच्या प्रयोगापासून ते २०१३ साली प्रसिद्ध झालेल्या डिजिटल युगातील हॅम्लेटच्या प्रयोगापर्यंत शेक्सपिअरच्या नाटकांचा प्रवास या प्रदर्शनात आढळतो.




**To the Reader.... A copy of Shakespeare's first folio CREDIT: CLARE KENDALL**

या प्रदर्शनाचा पहिला भाग हा शेक्सपिअरच्या नाटकांच्या हस्तलिखितांचे एक सुंदर दालन आहे. शेक्सपिअरच्यर समग्र नाटकांचा संच ज्याला 'फर्स्ट फोलिओ' म्हणतात ती एकमेव हस्तलिखित प्रत इथे आहे. १६०३ साली प्रसिद्ध झालेली हॅम्लेटची जगातील एकमेव प्रत इथे पाहायला मिळते. शेक्सपिअरने लिहिलेल्या पण कधीही सादर न झालेल्या 'द बुक ऑफ सर थॉमस मूर' या नाटकातील एक प्रवेश खुद्द शेक्सपिअरच्या हस्ताक्षरात उपलब्ध आहे. हा शेक्सपिअरच्या हस्ताक्षराचा एकमेव उपलब्ध नमूना मानण्यात येतो.



**Shakespeare's handwriting**

यानंतर त्या दहा प्रयोगांबद्दल सविस्तर माहिती आहे. ज्या प्रयोगांमुळे शेक्सपिअर आजपर्यंत झिरपत आला व आपलं जे शेक्सपिअरच्या साहित्याचं आकलन आहे ते या दहा प्रयोगांनीच मूर्त स्वरुपात आलं. ते दहा अॅक्ट पुढील प्रमाणे –

**अॅक्ट १ :** १६०० साली शेक्सपिअरने 'लॉर्ड चेंबरलेन्स मेन' या नाट्यमंडळींसाठी 'हॅम्लेट' हे नाटक लिहून त्याचा ग्लोब थिएटरमध्ये प्रयोग केला. नॉर्स लोकांच्या लोकवाङ्‌मयातून हॅम्लेटची कथा घेऊन शेक्सपिअरने त्यात प्राण फुंकले. हा प्रयोग इतका यशस्वी ठरला की तोपर्यंत बऱ्याच शोकात्म नाटकांना लिहूनही शेक्सपिअरला इतकी प्रसिद्धी मिळाली नाही तितकी या हॅम्लेटच्या प्रयोगाने मिळवून दिली. त्याकाळी नाटकामध्ये 'बदला' (Revenge) हा एक महत्त्वाचा धागा दिसून येतो. डॉ. जॉन्सन या समीक्षकाच्या मते १६ व्या शतकातील इंग्रजी समाज हा 'नागर' (Civilized) नव्हता म्हणून 'हॅम्लेट' मध्ये शेक्सपिअरला रक्तपात घडवावा लागला. मात्र शेक्सपिअरचा हॅम्लेट हा केवळ रक्तपिपासू नसून विचारी व तत्त्वज्ञ आहे.

या प्रयोगाचं वैशिष्ट्य म्हणजे शेक्सपिअरने आपला जीवलग मित्र रिचर्ड बर्वेजला हॅम्लेटच्या मुख्य भूमिकेत कल्पून नाटकाची संहिता लिहिली. तेव्हापासून अनेक नटांसाठी हॅम्लेटची भूमिका ही त्यांचं करिअर ठरवणारी व घडवणारी भूमिका वाटते. या प्रदर्शनात एक मानवी कवटी (skull) ठेवली असून सारा बर्नहॅट या जगप्रसिद्ध अभिनेत्रीने अठराव्या शतकात हॅम्लेटची भूमिका करताना ही कवटी वापरली आहे. प्रख्यात फ्रेंच लेखक व्हिक्टर ह्यूगो याने या कवटीवर खालील ओळी लिहिल्या आहेत.–

"Skeleton, What have you done with your soul? lamp, What have you done with your flame? Empty Cage, What have you done with the beautiful bird that used to sing?"



**To be, or not to be... A human skull presented to actress Sarah Bernhardt by Victor Hugo for her Hamlet CREDIT: CLARE KENDALL**

या ओळी वाचल्या की हॅम्लेटमधील प्रसिद्ध ग्रेव्हडिगर सिन (Gravedigger's Scene) ची आठवण येते. ही कवटी हातात घेऊन शेक्सपिअरचा हॅम्लेट आपली स्वगतं (Soliloquey) म्हणतो.

**ॲक्ट २ :** शेक्सपिअरच्या काही प्रसिद्ध व शेवटी लिहिलेल्या नाटकांपैकी एक म्हणजे 'द टेम्पेस्ट'. १६१०-११ दरम्यान 'ब्लॅकफ्रेअर्स प्लेहाऊस' या नाट्यमंडळींसाठी लिहिलेलं 'द टेम्पेस्ट' हे नाटक म्हणजे सतराव्या शतकात प्रसिद्धिस पावणाऱ्या 'मास्क' या नाट्यप्रकाराचा उत्कृष्ट नमूना आहे. मास्क (Masque) म्हणजे ज्यात संगीत, जादू, रंगभूषा व प्रकाश योजनेचे अनेक प्रयोगशील प्रयत्न. नाटकाच्या सुरुवातीला प्रॉस्पेरो एका निर्जन बेटावर 'एरियल' या आपल्या गुलामाकडून एक सुंदर जादूई खेळ घडवून आणतो. त्याने उभं केलेलं हे जादूई विश्व कुठल्याही आधुनिक (लाईट इफेक्टस्) प्रकाश योजनेशिवाय उभं केलेलं आहे. या प्रदर्शनात 'एरिअल'ची एक भूताकृती वरच्या बाजूनी लटकवली आहे. त्याच्या खाली गेल्यास वाटत राहतं की, आता प्रॉस्पेरो येणार व जादूई प्रवासाला आपल्याला घेऊन जाणार.



**Masque in The Tempest**

**ॲक्ट ३ :** यूरोपाबाहेर पहिल्यांदाच १६०७ साली शेक्सपिअर हयात असताना सादर झालेलं आफ्रिकन हॅम्लेट नाटक. १६ व्या शतकात जेव्हा इस्ट इंडिया कंपनीचं साम्राज्य जवळ जवळ सगळीकडे होतं तेव्हा इंग्रजांनी त्यांच्यासह शेक्सपिअर नेला. दि. ५ सप्टेंबर १६०७ साली एका बोटीवर 'रेड ड्रॅगन' या नाटक कंपनीच्या चमूने आफ्रिकन पाहुण्यांसमोर हे नाटक सादर केले. इथूनच शेक्सपिअरचा इंग्लंडच्या बाहेर प्रवास सुरू झाला. Language carries the culture म्हणतात ते उगीच नाही.

**ॲक्ट ४ :** शेक्सपिअरच्या नाटकांची प्रसिद्धी ही चरमसीमेवर असताना ८ डिसेंबर १६६० साली लंडनमध्ये 'ऑथेल्लो' या नाटकाचा प्रयोग झाला. याचं वैशिष्ट्य म्हणजे पहिल्यांदाच एका स्त्रीने स्त्रीपात्राची भूमिका केली. ऑथेल्लोमधील डेस्डिमोनाची भूमिका प्रथमच एका स्त्रीने केली. तत्पूर्वी स्त्रियांच्या भूमिका पुरुषच करत असत. या प्रयोगामुळे स्त्रियांचा शेक्सपिअरच्या नाट्यप्रयोगात प्रवेश सुकर झाला व अनेक नाटकांमध्ये स्त्री पात्रांची मांदियाळी दिसू लागली. शेक्सपिअर संबंधी आकलनाचा हा एक महत्त्वाचा टप्पा.

**ॲक्ट ५ :** शेक्सपिअरची प्रसिद्धी १८ व्या शतकाच्या शेवटाला तर इतकी वाढली की, अनेक लेखकांनी आपली नाटकं शेक्सपिअरचीच म्हणून सादर करायला



**Costumes of Elizabethan age**

घेतली. १७९५ साली विल्यम हेन्री आयर्लंड या लेखकाने असं जाहीर केलं की, त्याला शेक्सपिअरच्या काही नाटकांची हस्तलिखितं सापडली. त्यासोबत शेक्सपिअरची सहीसुद्धा होती. सर्व ब्रिटिश जनता आनंदून गेली. दि. २ एप्रिल १७९६ साली व्होर्टिगर्न (Vertigern) या नाटकाचा प्रयोग थिएटर रॉयन, ड्री लेन, लंडन येथे झाला. विल्यम आयर्लंडने सांगितलं की, हे शेक्सपिअरनेच लिहिलेलं नाटक असून त्याची एकमेव प्रत त्याला सापडली. हे नाटक लोकांच्या पसंतीला उतरलं नाही व हिरमूसलेल्या प्रेक्षकांनी त्याची भरपूर थट्टा केली व या लेखकाची बनवेगिरी उघडी पडली. अर्थात या विल्यम आयर्लंडने स्वतःच 'व्होर्टिगर्न' हे नाटक लिहून शेक्सपिअरच्या नावावर खपवले होते. हा गमतीदार किस्सा पाहून शेक्सपिअरचेच समकालीन असलेले महाराष्ट्रातील संत तुकाराम यांची आठवण होते. तुकोबांच्या काळात त्यांचे समकालीन 'सालो मालो' या नावाच्या महाभागाने 'तुका म्हणे' खोडून 'सालो मालो म्हणे' म्हणून तुकोबांच्या अनेक अभंगाचे वाङ्मयचौर्य केलेलं आहे!

**ॲक्ट ६ :** शेक्सपिअरच्या नाटकांच्या आकलनासाठी महत्त्वपूर्ण असा पुढचा टप्पा म्हणजे १८२५ साली लंडनस्थित 'रॉयल्टी थिएटर' इथे झालेला 'ऑथेल्लो' चा प्रयोग. या नाटकाचं वैशिष्ट्य म्हणजे ऑथेल्लो या कृष्णवर्णीय उमरावाची भूमिका प्रथमच एका कृष्णवर्णीय युवकाने केली. याचं नाव इरा ॲल्ड्रीज. याचा जन्म १८०७ साली अमेरिकेत झाला. तेव्हा गुलामीची परंपरा शाबूत होती. शेक्सपिअरच्या प्रेमापोटी त्याने 'रोमियो



**Othello, The Moor of Venice, 1826 : The first Black hero**

ज्युलिएट' या नाटकात रोमिओची भूमिका केली व त्याला वर्णविद्वेषातून अटक झाली. हा मुलगा १८२४ ला लंडनला पळून आला व त्याने ऑथेल्लोची भूमिका केली. याचं भव्य पोर्ट्रेट या प्रदर्शनात लावलं आहे.

**ॲक्ट ७ :** सतराव्या शतकाच्या शेवटापर्यंत शेक्सपिअर ब्रिटिशांना जुन्या वळणाचा (जुनाट) वाटू लागला व अनेक नाटकांचे त्या त्या शतकाच्या काळानुसार स्थलकालसापेक्ष पुनर्लेखन होऊ लागले. अनेक नाटककारांनी शेक्सपिअरच्या भाषेत बरीच अश्लिलता आहे असे दाखवून देत त्याचं 'शुद्ध देशी' व्हिक्टोरियन इंग्रजीत रुपांतर केलं. या क्रियेतूनच "Bowlderize" हा शब्द रूढ झाला. नहूम टेटे या रेस्टोरेशन काळातील नाटककाराने १६८१ साली 'किंग लिअर'चं पुनर्लेखन केलं. या नाटकाचा लहेजा पूर्ण बदलून त्याने मूळ शोकात्म नाटकाला सुखान्त नाटकात बदलून टाकलं.

टेटेच्या या रोमॅन्टिक व सुखान्त 'किंगलिअर' ने पुढील १५० वर्ष प्रेक्षकांना रमवलं. मात्र १८३८ साली चार्ल्स मॅकरेडि या नटाने शेक्सपिअरच्या मूळ 'किंग लिअर' या नाटकाचं पुनरुज्जीवन केलं. शेक्सपिअरच्या मूळ 'किंग लिअर' नाटकातील विदूषकाचं पात्र देखील मॅकरेडिने परत प्रचलनात आणलं व त्यामुळे त्याला भरपूर प्रसिद्धी मिळाली. या नाटकाची सुंदर पोर्ट्रेट्स या प्रदर्शनात पाहायला मिळतात.

**ॲक्ट ८ :** काळाप्रमाणे साहित्याची रुची व आकलनाचे मापदंड बदलत असतात. मात्र काळाच्या कसोटीवर खरं उतरणारं तेच खरं साहित्य असतं याचा प्रत्यय शेक्सपिअरच्या नाटकांकडे पाहून होतो. मागच्या ५०

वर्षातील सर्वात परिणामकारक असं नाटक म्हटलं तर ते पीटर ब्रुकने सादर केलेलं 'मिडसमर नाईट्स ड्रीम' हे नाटक. रॉयल शेक्सपिअर कम्पनीमध्ये १९७० साली याचा प्रयोग झाला. पिटर ब्रूक या जगप्रसिद्ध नाट्यदिग्दर्शकाने 'मिडसमस् नाईटस् ड्रिम' या शेक्सपिअरच्या रोमॅन्टिक कॉमेडीचा व्हिक्टोरियन काळातला भपकेबाजपणा काढून आधुनिक काळातील ॲवस्ट्रॅक्ट पार्श्वभूमी वापरली. चाइनिज सर्कसमधील अंगविक्षेपांनी प्रभावीत होऊन ब्रूकने या नाटकाला एक नवं वळण दिलं जे १९६० साली प्रसिद्ध असलेल्या हिप्पी कल्चरला साजेसं होतं.



**Peter Brook's A Midsummer Night's Dream 1970s**

'This was a dyanamic Dream for a new generation. Its symbolic elements, so startling to audiences at the time, have since become familias motifs of Shakespearean performance.'

**ॲक्ट ९** : विसाव्या शतकात शेक्सपिअरच्या अनेक नाटकांना नवीन युगाच्या परिप्रेक्ष्यात पुनरुज्जिवीत करण्याचे अनेक प्रयत्न झाले. त्यातील सर्वात महत्त्वाचा प्रयोग म्हणजे ग्लोब थिएटरमध्ये झालेला २००२ सालचा ट्रेवल्फथ नाईट (Twelfth Night). या प्रयोगात संगीत, वेशभूषा, रंगयोजना यांचा पूर्ण नव्याने उपयोग करून संपूर्ण नाटक हे स्त्री पात्राशिवाय सादर केलं गेले असून, एक वैशिष्ट्य म्हणजे हे नाटक मिडल टेम्पल हॉलमध्ये सादर झालं, जिथे ४०० वर्षांपूर्वी शेक्सपिअरने हेच नाटक सादर केलं होतं.

**ॲक्ट १०** : सोळाव्या शतकात सुरू झालेल्या शेक्सपिअरच्या या नाट्यप्रयोगाचं एक संपूर्ण वर्तुळ पूर्ण झालं जेव्हा 'द व्हूस्टर ग्रुप' या अमेरिकेतील प्रथित यश निर्माती समूहाने हॅम्लेटचा एक डिजीटल प्रयोग सादर केला. इडनबर्ग आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात २०१३ साली याचा प्रयोग झाला तेव्हा प्रेक्षकांनी याला डोक्यावर उचलून घेतलं. हा चित्रपट म्हणजे सध्याच्या उत्तर आधुनिक (Post-Modern Age) युगातील मूळ नाटकाचे विखंडन (Deconstruction) आहे.

१९६४ च्या ब्रॉडवे प्रोडक्शनच्या 'हॅम्लेट' या चित्रपटाची पार्श्वभूमी या चित्रपटाला आहे. अन्य 'हॅम्लेट' चित्रपटाचं फुटेज आत मिसळवलं आहे. संवादातील कविता व काव्याचा बाज बदलला आहे व एक विखंडीत वास्तव साकारलं आहे. ज्यात आधुनिक हॅम्लेट 'To be or not to be' हाच आदिम प्रश्न विचारतो. या प्रदर्शनात एक फ्लेक्स आहे जो २०१३ सालच्या या आधुनिक हॅम्लेटबद्दल म्हणतो –

"The Wooster Group repurposed the film to glostly effect: erasing characters, fast-forwarding, jump-cutting, altering the metre of the poetry and intercutting the footage with other Hamlet films. Their intention was to reconstrut a hypotheticl theatre piece from the fragmentary evidence of the edited film, 'Like an archologist inferfing a temple from a collection of mins."

या दोनही प्रदर्शनांनी शेक्सपिअर संबंधानं माझं आकलन प्रगल्भ केलं. एखादं राष्ट्र जगात परमवैभवाच्या शिगेला पोहोचतं याचे त्या राष्ट्राच्या लेखकांप्रति असलेल्या त्यांच्या गौरवाच्या व अभिमानाच्या धारणेत

असतं. थॉमस कार्लाइल या श्रेष्ठ लेखकानं नमूद केलंय की, ब्रिटिशांना कुणी प्रश्न विचारला की, तुम्ही भारताचं साम्राज्य व शेक्सपिअर या दोहोंमध्ये कोणाला निवडाल? तर ब्रिटिश निःसंशयपणे शेक्सपिअरला निवडतील. कारण शेक्सपिअर शिवाय इंग्रजी अस्मिता, संस्कृती व सभ्यता पूर्ण होत नाही. कार्लाइलच्या शब्दात सांगायचं झालं तर –

"Consider now, if they asked us, will you give up your Indian Empire or your Shakespear? We will answer: Indian Empire or no Indian Empire we cannot do without Shakespeare!"

हे सर्व पाहून, वाचून असं वाटत राहतं की, भारतीयांनी ब्रिटिशांची 'संस्कृती प्रती अभिमान' ही वृत्ती घ्यावी. मात्र केवळ अभिमान न बाळगता त्याचं उत्तम सादरीकरण, प्रचार व प्रसार जमला पाहिजे. शेक्सपिअरच्याच समकालीन असलेल्या तुकाराम महाराजांचं उदाहरण घेतलं तर लक्षात येतं की, तुकोबा केवळ पोथीत व अभंग गाथेतच अडकले आहेत. भारतीयांना ना कालिदास मिरवता आला ना अन्य कोणी तत्त्वज्ञ संत मिरवता आला. आम्ही कुठे कमी पडलो या प्रश्नाची बोचणी कायम मनात राहते. विंदा करंदीकरांनी शेक्सपिअर व तुकोबाची काल्पनिक भेट घडवून आणली आहे. त्यांच्या 'तुकोबाच्या भेटी शेक्सपिअर आला' या कवितेत ते म्हणतात –

''तुकोबाच्या भेटी। शेक्सपिअर आला
तो झाला सोहळा। दुकानात
तुका म्हणे विल्या। तुझे कर्म थोर।
अवघाचि संसार। उभा केला
शेक्सपिअर म्हणे। एक ते राहिले
तुवा जे पाहिले। विटेवरी!''

**– प्रा. प्रशांत धर्माधिकारी**
इंग्रजी विभाग, तोलानी वाणिज्य महाविद्यालय,
अंधेरी, मुंबई–९३.
भ्रमणध्वनी : ९४२२४९५०९४

(पृष्ठ क्र. ७ वरून - **ओळख वनस्पतींची**)

श्वसन विकार इत्यादी अनेक आजारांवर हे फळ गुणकारी आहे. मात्र याचा उपयोग तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच करणे उत्तम. या गरामध्ये उच्च प्रतीची पोषणमूल्ये आहेत असेही निदर्शनास आले आहे.

या झाडाबाबत तसेच त्याच्या औषधी गुणांबाबत भारतीयांना सुमारे ५००० वर्षांपूर्वीपासून माहिती आहे. आदिवासींचे ते तर अन्न आहे. फळे पिकली की ती मिळविण्यासाठी चाललेली आदिवासींची झुंबड मी जंगलात प्रत्यक्ष पाहिली आहे. कवच कठीण असल्याने ते खाली पडून फुटल्याशिवाय प्राण्यांना मात्र याचा आस्वाद घेता येत नाही. बेल किंवा बेलफळाचा औषधी गुणधर्म मर्यादित असल्यानेच ते सहज व लवकर उपलब्ध व्हावे म्हणून बहुतेक मंदिरांच्या परिसरात याचे एक तरी झाड असायचे. या झाडाची लागवड ताज्या बीयांपासून करावी लागते. जास्त जून बीया रुजत नाहीत. जंगलामध्ये खाली पडून फुटलेल्या फळांमधील बीया प्राण्यांच्या विष्टेद्वारे इतरत्र पसरतात व लगेच अनुकूल परिस्थिती उपलब्ध झाली की रुजतात. अशी रुजलेली लहान रोपटी घेऊनही याची लागवड करता येईल; मात्र बीयांपासून स्वतःच रोपे केलेली उत्तम. आधीच जंगलांमध्ये या झाडांची संख्या फार कमी असते. पूजेकरिता भरपूर मागणी असल्याने आदिवासी लोक किंवा जंगलाच्या सानिध्यातील ग्रामीण लोक ही झाडे अक्षरशः ओरबाडून पाने मिळवितात. त्यावेळी अनेक फांद्याही तुटतात, पर्यायाने झाडाची वाढ खुंटते. परमेश्वराने ही सर्व सृष्टी निर्माण केली. त्यालाच अर्पण करण्यासाठी जेव्हा आपण ही झाडे ओरबाडतो तेव्हा तो नक्कीच दुःखीकष्टी होत असावा. त्यापेक्षा एकही पान पूजेसाठी न तोडता झाडे समृद्ध केली तर ती परमेश्वराची खूप मोठी पूजा ठरेल यात शंका नाही.

**– प्रकाश दुधाळकर**
एफ–२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर–नवघर लिंक रोड,
मुलंड (पू.), मुंबई – ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२

---

आपल्याकडे काय आहे किंवा आपण कोण आहोत यावर सुख कधीच अवलंबून नसतं.
आपल्या मनात कोणते विचार चालू आहेत यावर सुख अवलंबून असतं.

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

- **गणेशोत्सव**



आपल्या शाळेत गणेशोत्सव दरवर्षीप्रमाणे यावर्षीही साजरा करण्यात आला. परंतु यावर्षीच्या गणेशोत्सवाचे वेगळेपण म्हणजे गणपतीसाठी बनवलेले ताज्या आणि खऱ्या पानाफुलांचे इको-फ्रेंडली मखर. हे वैशिष्ट्यपूर्ण मखर आपल्या शाळेतील शिक्षिका सौ. कल्पना बोरवणकर आणि सौ. पूनम देवघरे यांनी तयार केले होते. शाळेतील सर्वांनीच या मखराचे विशेष कौतुक केले.

- **संस्कार वर्ग**

बालप्रबोधिनी अंतर्गत संस्कारवर्गासाठी आपल्या शाळेतील इ. ६ ब चा वर्ग निवडला आहे. वर्षभरात सदर संस्कारवर्गासाठी मंगळवारची एक तासिका नेमून देण्यात आली आहे.

- **अभिनंदन**

दि. १८ सप्टेंबर २०१६ रोजी 'भारत विकास परिषदे' तर्फे संस्कृत व हिंदी गीत गायन स्पर्धा घेण्यात आली. सदर स्पर्धेत इ. ७ वी, ८ वीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या विद्यार्थ्यांना पदक आणि प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात आले. सर्वांतर्फे अभिनंदन!

- श्री समर्थ सेवक मंडळाची स्त्री कल्याण संघटना, ठाणे आयोजित २४ सप्टेंबर २०१६ रोजी घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत कु. समर्थ मनिष चौधरी इ. ८ अ यास द्वितीय क्रमांकाचे वैयक्तिक पारितोषिक मिळाले.

- २५ सप्टेंबर २०१६ रोजी लायनेस क्लब ऑफ उपवन, ठाणे तर्फे आयोजित शिक्षक दिनाच्या कार्यक्रमात आपल्या शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री. प्रकाश पांचाळ यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

तसेच इ. १० ब मधील कु. अथर्व भोईर याला All rounder student म्हणून गौरवण्यात आले.

त्याचप्रमाणे ब्राह्मण सेवा संघातर्फे दिला जाणारा 'आदर्श शिक्षक' पुरस्कार या वर्षी आपल्या शाळेतील कला शिक्षक सौ. कल्पना बोरवणकर यांना देण्यात आला. सर्वांतर्फे हार्दिक अभिनंदन!

- 'Institute of Phychological Health' (IPH) आणि 'वयम' मासिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'बहुरंगी बहर' या व्यक्तिमत्त्व स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून सहभागी झालेल्या १२०० स्पर्धकांमधून गटचर्चेसाठी निवडलेल्या प्रथम ५० स्पर्धकांमध्ये आपल्या शाळेतील कु. ऋचा योगेश जोशी इ. ८ अ हिची निवड झाली. सर्व स्पर्धकांना गट चर्चेमध्ये स्वतः ज्येष्ठ मानसोपचार तज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांनी बोलतं केलं.



---

चालून पाय थकायला नको म्हणून डोकं चालवतो तो खरा माणूस.

तसेच २५ सप्टेंबर रोजी झालेल्या कै. जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धेत मोठ्या गटात १) कु. ऋचा योगेश जोशी इ. ८ अ सर्वप्रथम २) कु. प्रज्ञा राजेंद्र मोरे इ. ८ अ आणि कु. यज्ञेश राणे इ. ८ इ यांना तृतीय क्रमांकाचे पारितोषक विभागून देण्यात आले.

यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन!

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

IPM (Institure for the Promotion of Maths) २०१६ मध्ये प्राथमिक विभागातून खालील विद्यार्थी मेगा फायनल परिक्षेत राष्ट्रीय स्तरावर उत्तीर्ण झाले.

| इयत्ता २ री | राष्ट्रीय क्रमांक |
|---|---|
| १) निहाल ठोसर | ५२ |
| २) आदित्य खोल्लम | ५३ |
| ३) सची परशुरामी | ९१ |
| ४) आदित्य खानझोंडे | ९९ |

| इयत्ता ३ री | राष्ट्रीय क्रमांक |
|---|---|
| १) मानस साठे | २३५ |

| इयत्ता ४ थी | राष्ट्रीय क्रमांक |
|---|---|
| १) हर्षल पेडणेकर | १८८ |

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाला**

**“Opportunities for Industry-Academia Interaction in Biotechnology : Examples from my Research”**

डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाले अंतर्गत पहिले व्याखयान २८ एप्रिल २०१६ रोजी महाविद्यालयाच्या पतंजली सभागृहात संपन्न झाले. यावेळी प्रा. प्रमोद वांगीकर रसायनशास्त्र अभियांत्रिकी विभाग आय. आय. टी. पवई यांनी “Opportunities for Industry-Academia Interaction in Biotechnology : Examples from my Research” या विषयावर व्याख्यान दिले.

शैक्षणिक व उद्योग क्षेत्रातील आदान-प्रदान हे शैक्षणिक क्षेत्राला अतिशय उपयुक्त ठरेल असे मत यावेळी बोलताना त्यांनी व्यक्त केले.

त्यांनी जैवतंत्रज्ञान विषयाशी संबंधीत औद्योगिक व शैक्षणिक क्षेत्रातील आदान प्रदानाचे स्वरूप सर्वप्रथम समजावून सांगितले.

तसेच त्यांच्या सध्या चालू असलेल्या “Development of enzymes and processes for alcohot dehydrogenase catalyzed chira synthesis” and “Isotopic non-stationary$^{13}$ C-metabolic flux analysis of cyanobacteria”

या दोन प्रकल्पांबाबत चर्चा केली. हे दोन्ही प्रकल्प लाईफ सायन्स व अभियांत्रिकी या दोन्ही विषयांशी जोडले गेलेल्या त्यांच्या प्रकल्पांबाबत चर्चा केली.

या व्याख्यानाला विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**“Chemistry the Central Science”**

डॉ. वा. ना. बेडेकर व्याख्यानमाला या व्याख्यानमालेतील तिसरे व्याख्यान २५ जुलै २०१६ रोजी संपन्न झाले. यावेळी डॉ. रवी देशमुख, प्राचार्य कोकण ज्ञानपीठ यांनी “Chemistry the Central Science” विषयावर व्याख्यान दिले. विज्ञानातून पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रसायनशास्त्र विषयाशी निगडित विविध क्षेत्रांबद्दल माहिती व्हावी हा या व्याख्यानाचा मुख्य हेतू होता.

विविध क्षेत्रात जसे वैद्यकीय, पर्यावरण विज्ञान, अभियांत्रिकी, गुन्हे अन्वेषण, शिक्षण इत्यादी अनेक क्षेत्रात रसायनशास्त्र हा प्रमुख विषय गणला जातो.

माणूस घरे बदलतो, माणूस मित्र बदलतो, माणूस कपडे बदलतो, तरी तो दुःखी असतो;
कारण तो आपला स्वभाव बदलत नाही.

रसायनशास्त्र प्रयोगशाळेत काम करत असतानाच विद्यार्थ्यांमध्ये संशोधन दृष्टी विकसित होऊ शकते असेही त्यांनी नमूद केले.

अतिशय खुमासदार भाषेत देशमुख सरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला व त्यांच्या शंकाचे निरसन केले. २१८ विद्यार्थी व १७ शिक्षक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**Indian Wildlife : A Naturalist's Perspective**

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय व होप नेचर टस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण व्याख्यानमाले अंतर्गत शैलेंद्र पाटील, निसर्गतज्ज्ञ यांचे "Indian Wildlife : A Naturalist's Perspective" या विषयावर दि. ३० जुलै २०१६ रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी त्यांनी भारतातील विविध वन्य वनस्पतीं बद्दलची माहिती दिली. तसेच त्यांनी वाघ, बिबट्या, जंगली कुत्रे इत्यादींबाबत जंगलात फिरत असताना आलेले अनुभव सर्वांना सांगितले.

**पालक सभा**

प्रथम वर्ग,व्दितीय वर्ग व तृतीय वर्ग जैवरसायनशास्त्र शाखेतील विद्यार्थ्यांची पालक सभा ३० जुलै २०१६ रोजी घेण्यात आली.

यावेळी पालकांना महाविद्यालयातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांबाबत जसे अभ्यास सहल, संशोधनपर कार्यक्रम, अभ्यासक्रमाव्यतिरिक्त व्यक्तिमत्त्व विकासाचे कार्यक्रम, नवीन अभ्यासक्रम, नवीन प्रश्नपत्रिका स्वरूप इ. बाबत विस्तृत माहिती जैवरसायनशास्त्राच्या सर्व शिक्षकांनी दिली.

**ग्रीन फोर्स नेचर क्लब**

प्राणिशास्त्र विभागाच्या 'ग्रीन फोर्स नेचर क्लब' विभागातर्फे १३ ऑगस्ट २०१६ रोजी प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांचे 'Australia from Bird's Eye-View' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

या व्याख्यानाच्या सुरुवातीला त्यांनी ऑस्ट्रेलियातील त्यांच्या वास्तव्याच्या काळात तिथे पाहिलेले पक्षी व प्राणी याबाबत माहिती सर्वांना सांगितली. निसर्गाचे संवर्धन करणे हे अतिशय महत्त्वपूर्ण आहे असा संदेश त्यांनी मुलांना दिला.

**अभ्यास सहल, वनस्पतीशास्त्र विभाग**

प्रथम वर्ष व तृतीय वर्ष विज्ञान शाखेतील वनस्पतीशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची अभ्यास सहल दि.१० ऑगस्ट २०१६ रोजी आयोजित करण्यात आली होती.

यावेळी त्यांनी पेण येथील युसुफ मेहेरअली सेंटर, गो ग्रीन नर्सरी, एव्हरग्रीन नर्सरी व सेंट्रल पार्क, खारघर इत्यादी ठिकाणी भेटी दिल्या. प्रथम वर्ष विज्ञान शाखेतील ९४ व तृतीय वर्ष विज्ञान शाखेतील १५ विद्यार्थी या अभ्यास सहलीकरता उपस्थित होते.

**सूक्ष्म जीवशास्त्र विभाग**

द्वितीय वर्ष सूक्ष्म जीवशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची अभ्यास सहल दि.१६ ऑगस्ट २०१६ रोजी CETP (Common Effluent Treatment Plant), कोपरखैरणे येथे आयोजित करण्यात आली होती.

CETP येथील श्री. महेश पाटील यांनी सर्वांना प्रायमरी व सेकंडरी इफ्लुएंट बद्दल माहिती दिली. तसेच एरेशन टॅक, क्लॅरिफायर, इक्वलायझेशन न्यूट्रलायझेशन टॅक, डिकॅन्टर व थिकनर याबाबत अधिक माहिती दिली.

या अभ्यास सहलीमुळे सर्व विद्यार्थ्यांना Waste Water Treatment बाबत अधिक माहिती मिळाली.

२७ विद्यार्थी व ३ शिक्षक या अभ्यास सहलीमध्ये सहभागी होते.

**"Lessons of Leadership through great spirits of Olympics"**

जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे ३० जुलै २०१६ रोजी डॉ.लकी वासट यांचे "Lessons of Leadership through great spirits of Olympics" यावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्पर्धेत यशस्वी झालेले काही ऑलिंम्पिक विजेत्यांचे दाखले त्यांनी दिले. कोणत्याही स्पर्धेत विजयी होणे हेच लक्ष्य न ठेवता त्या स्पर्धेत सहभाग घेणे हेसुद्‌धा अतिशय महत्वाचे आहे.

आयुष्य जगत असताना आपल्याकडे काय नाही याबाबत तक्रार करत जगण्यापेक्षा आलेला प्रत्येक्ष क्षण हा आपण अनुभवला पाहिजे असा संदेश त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिला.

२४ शिक्षक व २०० विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषद–पूर्व कार्यशाळा संपन्न**

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषद–पूर्व कार्यशाळेचे आयोजन २० ऑगस्ट २०१६ रोजी करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे ६–७ जानेवारी २०१७ या कालावधी मध्ये आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या व्याख्यानांसाठी तयार करण्यासाठी दोन परिषद–पूर्व कार्यशाळा व व्याख्यानमालेचेही आयोजन करण्यात आले आहे. **'Emerging Technologies for Sustainable Agriculture'** या कृषिविषयक २० ऑगस्ट २०१६ रोजी संपन्न झालेल्या परिषद–पूर्व कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद लाभला.

सह–अध्यापिका डॉ. देवधर, वझे महाविद्यालय, मुंबई, झी मराठी 'उंच माझा झोका' पुरस्कार प्राप्त उद्योजिका सौ. कविता जाधव–बिडवे आणि सौ. शिवानी पटेल, एम. एन. वीरानी विज्ञान महाविद्यालय, राजकोट यांची व्याख्याने या कार्यशाळेत संपन्न झाली. विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून पाहुण्यांशी संवाद साधला.

विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्रेरित करण्यासाठी बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय गेली १४ वर्षे सातत्याने राष्ट्रीय परिषदांचे आणि मागील वर्षापासून आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करीत आहे.

या परिषदेतील पुढील कार्यशाळा १९ नोव्हेंबर २०१६ रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृह, महाविद्यालय संकुल येथे संपन्न होईल. या सर्व कार्यशाळा, व्याख्याने व परिषदांबद्दल विस्तृत माहिती www.vpmthane.org या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

## विद्या प्रसारक मंडळाचे<br>ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

- टाटा इन्स्टिटट्यूट ऑफ सोशल सायन्स, मुंबई यांनी आयोजित केलेल्या कायदेशीर साक्षरता चर्चा सत्रामध्ये विधी महाविद्यालयाच्या वतीने प्रा. विनोद वाघ व विद्यार्थी प्रतिनिधी रामरक्षा सोनार यांनी सहभाग घेतला. यावेळी महाविद्यालयाने कायदेशीर साक्षरता कशी आयोजित करावी यावर चर्चा करण्यात आली. चर्चासत्रामध्ये मुंबई विद्यापीठा अंतर्गत अनेक विधी महाविद्यालयांनी भाग घेतला. शासकीय विधी महाविद्यालय प्रवीण गांधी विधी

महाविद्यालय, अडवाणी विधी महाविद्यालय या वेळी सर्वांनी त्यांचे अनुभव व अडचणी याविषयी विवेचन केले.

- विधी अभ्यासक्रमाचे प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया या वेळी CET CELL महाराष्ट्र राज्य शासन यांच्या माध्यमातून दिनांक १५ सप्टेंबर २०१६ पासून सुरू करण्यात आले. यावेळी CET CELL ने घालून दिलेल्या नियमानुसार प्रवेश प्रक्रिया घेण्यात आली. तसेच प्रथम विधी वर्गाचे शिकवणी वर्ग दिनांक २२ सप्टेंबर, २०१६ पासून सुरू करण्यात आले.
- तृतीय विधीच्या विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परिक्षेचा भाग असलेली 'अभिरुप न्यायालय परिक्षा' दिनांक ३० सप्टेंबर २०१६ रोजी घेण्यात आली. त्यावेळी प्राध्यापकांनी जज्ज म्हणून सदर परिक्षा घेतली.
- नारी गुरसहानी विधी महाविद्यालय, उल्हासनगर यांनी आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या द्वितीय विधीच्या विद्यार्थ्यांनी कु. सारा मोमीन व कु. दीपा यांनी प्रथम पारितोषीक मिळविले.
- मणिपाल विद्यापीठ, जयपूर यांनी आयोजित केलेल्या रंका मेमोरियल अभिरुप न्यायालय स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या द्वितीय विधीच्या विद्यार्थ्यींनी कु. ऐश्वर्या गोखले, कु. ऐश्वर्या चिटणीस व श्रीमती नीनु दुग्गल यांनी भाग घेतला.
- महाविद्यालयाच्या द्वितीय विधीचा विद्यार्थी स्वानंद गांगल यांनी नी. गो. पंडितराव राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावले. तसेच ठाण्यामधील ग. का. फणसे मेमोरीयल स्पर्धेमध्ये देखील पारितोषिक मिळविले.

•••

(पृष्ठ क्र. ६ वरून - **इंडियन इन्स्टिट्यूट, ऑक्सफर्ड)**

केली. आता या इमारतीमध्ये मार्टिन स्कूल आहे. रिचर्ड मार्टिन यानी विद्यापीठाला दिलेल्या देणगीतून या संस्थेची निर्मिती करण्यात आली आहे. या संस्थेत विसाव्या शतकातील संधी आणि समस्या या महत्त्वाच्या विषयावर संशोधन केले जाते. भारतीय लोकांच्या पैशाने ही इमारत बांधण्यात आली. त्यामुळे ही संस्था बंद करणे योग्य नाही. तेथे भारतीय संस्था पुन्हा सुरू करण्यात यावी असा काही भारतीय विद्वानांचा प्रयत्न आहे. त्यांच्या या प्रयत्नांना यश येवो ही सदिच्छा.



**सध्याची ऑक्सफर्ड मार्टिन स्कूल**

**– डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण–शीळ रोड,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे – ४२१२०४

•••

यश न मिळणे याचा अर्थ अपयशी होणे असा नाही.

(पृष्ठ क्र. २ वरून - **संपादकीय**)

मूलद्रव्याच्या कोष्टकांच्या संदर्भात यांनी लिहून ठेवले आहे की, -

"I saw in a dream a table where all elements fell into place as required. Awakening, I immediately wrote it down on a piece of peper, only in one place did a correction later seem necessary."

| Reihen | Gruppo I. — $R^2O$ | Gruppo II. — $RO$ | Gruppo III. — $R^2O^3$ | Gruppo IV. $RH^4$ $RO^2$ | Gruppo V. $RH^3$ $R^2O^5$ | Gruppo VI. $RH^2$ $RO^3$ | Gruppo VII. $RH$ $R^2O^7$ | Gruppo VIII. — $RO^4$ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | H=1 | | | | | | | |
| 2 | Li=7 | Be=9,4 | B=11 | C=12 | N=14 | O=16 | F=19 | |
| 3 | Na=23 | Mg=24 | Al=27,3 | Si=28 | P=31 | S=32 | Cl=35,5 | |
| 4 | K=39 | Ca=40 | —=44 | Ti=48 | V=51 | Cr=52 | Mn=55 | Fe=56, Co=59, Ni=59, Cu=63. |
| 5 | (Cu=63) | Zn=65 | —=68 | —=72 | As=75 | Se=78 | Br=80 | |
| 6 | Rb=85 | Sr=87 | ?Yt=88 | Zr=90 | Nb=94 | Mo=96 | —=100 | Ru=104, Rh=104, Pd=106, Ag=108. |
| 7 | (Ag=108) | Cd=112 | In=113 | Sn=118 | Sb=122 | Te=125 | J=127 | |
| 8 | Cs=133 | Ba=137 | ?Di=138 | ?Ce=140 | — | — | — | — — — — |
| 9 | (—) | — | — | — | — | — | — | |
| 10 | — | — | ?Er=178 | ?La=180 | Ta=182 | W=184 | — | Os=195, Ir=197, Pt=198, Au=199. |
| 11 | (Au=199) | Hg=200 | Tl=204 | Pb=207 | Bi=208 | — | — | |
| 12 | — | — | — | Th=231 | — | U=240 | — | — — — — |

**डिमिट्री मेंडेलिव्हची पहिली आवर्त सारणी**

**मेंडेलिव्ह आणि पाणिनि**

मेंडेलिव्ह यांच्या मूलद्रव्यांच्या कोष्टकातील मांडणीकरता त्यांना संस्कृतचे प्रसिद्ध व्याकरणकार पाणिनी यांच्याकडूनही प्रेरणा मिळाली होती अशी माहिति पॉल किपारस्की (Paul Kiparsky) या संशोधकानी अलीकडेच दिली आहे. मेंडेलिव्ह यांनी आपल्या कोष्टकामध्ये ८ मूलद्रव्यांना संस्कृत उपसर्गानी संबोधिले होते. उदाहरणार्थ एक, द्वि, त्रि. ही संस्कृत नावं तिथे कशी आली हा उलगडा बऱ्याच संशोधकांना होत नव्हता. ही यादी खालीलप्रमाणे आहे.

| Mendeleev's Given Name | Modern Name |
|---|---|
| Eka-aluminium | Gallium |
| Eka-boron | Scandium |
| Eka-silicon | Germanium |
| Eka-manganese | Technetium |
| Tri-manganese | Rhenium |
| Dvi-tellurium | Polonium |
| Dvi-caesium | Francium |
| Eka-tantalum | Protactinium |

सेंट पिटर्सबर्गमध्ये विज्ञानाचे आणि मानव्यशास्त्रातील अनेक अभ्यासक काम करीत असत. सेंट पिटर्सबर्ग ॲकॅडमी ऑफ सायन्सेस (St. Petersburg Academy of Sciences)च्या व्यासपीठावर भाषाशास्त्रापासून रसायनशास्त्रापर्यंतचे अनेक संशोधन निबंध वाचले जायचे. संस्कृतमधील पहिला संस्कृत-जर्मन शब्दकोश हा पिटर्सबर्ग येथेच संस्कृतचे संशोधक बोथलिंग (Otto Bohtlingk) आणि रॉथ (Roth) यांनी संपादित केला होता.

बोथलिंग यांनी पाश्चात्य अभ्यासकांकरता पाणिनीच्या व्याकरणावरती एक पुस्तक लिहिले होते. त्याच्या द्वितीय आवृत्तीच्या प्रकाशन समारंभाला बोथलिंग यांनी मेंडेलिव्ह यांना निमंत्रण दिले होते. संस्कृत आणि देवनागरीची स्वर आणि व्यंजनावर आधारित द्विस्तरीय, तसेच पाणिनीच्या शिवसूत्रांची माहिती मेंडलिव्ह यांना बोथलिंग यांचेकडून या समारंभाच्या वेळीच मिळाली असणार. संस्कृत भाषेच्या या शास्त्रशुद्धतेमुळे ते एवढे

प्रभावित झाले की, त्यांनी ती द्विस्तरीय रचना आपल्या मूलद्रव्यांच्या कोष्टकातही वापरली. या संदर्भात किपारस्की म्हणतात, -

"The analogies between the two systems are striking. Just as Panini found that the phonological petterning of sounds in the language is a function of their articulatory properties. So Mendeleev found that the chemical properties of elements are a function of their atomic weights. Like Panini, Mendeleev arrived at his discovery through a search for the "grammar" of the elements (using what he called principle of isomorphism, and looking for general formulas to 'generate the possible chemical compounds). Just as Panini arranged the sounds in order of increasing phonetic conplexity (e.g. whith the simple stops k.p, preceding the other stops, and representing all of them in expressions like KU, PU,) So Mendeleev arranged the elements in order of increasing atomic weights and called the first row (Oxygen, nitrogen, carbon etc.) 'typical (or representative) elements'- Just as Panini broke the phonetic parallelism of right of the labial in the nasal row, so Mandeleev gave priority to isomorphism over atomic weights when they conflicted, e.g. putting beryllium in the magnesium family because it patterns with it even through by atomic weight it seemed to belong with nitrogen and phosphorus. In both cases the periodicities they discovered would later be explained by a theory of th internal structure of the elements."

मेंडेलिव्ह यांचे एक समकालीन संशोधक मेयर (Meyer) यांनीही मूलद्रव्यांचे कोष्टक तयार केले होते. त्यामुळेच काही शास्त्रज्ञांनी या दोघांनाही मूलद्रव्यांच्या कोष्टकाचे श्रेय द्यावे असा आग्रह धरला होता. मेंडेलिव्ह यांनी आपल्या कोष्टकामध्ये eka-aluminium आणि eka-silicon असे उल्लेख करून काही मूलद्रव्यांचा गुणधर्मासकट अंदाज व्यक्त केला होता. आश्चर्याची बाब म्हणजे eka-aluminium म्हणजे गॅलियम (gallium, Ga) आणि, eka-silicon म्हणजे जर्म्यनियम (germanium, Ge) या मूलद्रव्यांचा शोध अनुक्रमे १८७५ आणि १८८६ साली संशोधकांनी लावला. संशोधकाच्या सृजनशीलतेला खरेच काही सीमा नसते याचेच हे उदाहरण आहे.

तत्त्वज्ञान, ग्रहगणितापासून रसायनशास्त्रापर्यंत अनेक क्षेत्रांमध्ये भारतीयांनी मूलभूत काम करून ठेवले आहे. मेंडेलिव्ह प्रमाणेच जगामधील अनेक संशोधकांनीही यातून प्रेरणा घेतल्याची उदाहरणे आहेत. याकरता कष्ट, प्रामाणिकपणा आणि अभ्यासाची गरज असते. ख्रिस्तपूर्व ५ व्या शतकातील पाणिनी, कौटिल्य, कालिदास, आर्यभट, भास्कराचार्य ते अगदी २० व्या शतकातील रामानुजम पर्यंत सर्व धर्म, परंपरा आणि संस्कृतीचे समर्थकच होते. या संकल्पना त्यांच्या सृजनशिलतेच्या आड आल्या नाहीत. अस्मितेचे ढोल पिटत, अवैध दही-हंडीचे थर लावणाऱ्यांना याचे काहीही सोयरसूतक नाही.

आपला धर्म, परंपरा आणि भाषाअभिमान यांची सूत्रे अशा निर्बुद्ध, धटिंगणांच्या हातात गेल्यावर 'धर्म' आणि 'परंपरे'ची काय दुर्दशा होते हे आपण आज आपल्या सणांना आलेल्या स्वरुपावरून अनुभवत आहोतच. भारताच्या संशोधन संस्कृतीची खरी ताकद, ही 'उन्मादी' सणांपेक्षा, संशोधनामध्ये आहे, आणि त्या दृष्टीने कष्ट केल्यास भारताला ती आजही 'महासत्ता' बनवू शकते.

मेंडेलिव्हची मूलद्रव्यांची कोष्टके काय किंवा बोथलिंग, रॉथ यांचा पहिला 'संस्कृत-जर्मन शब्दकोश' काय यामधून आपल्याला हाच धडा मिळतो!

**डॉ. विजय बेडेकर**

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.